# नाथा पंढरीनाथा

(देवभक्तिपर कवितासंग्रह – भाग १)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**नाथा पंढरीनाथा** (देवभक्तिपर कवितासंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : ज्येष्ठ कृ. ११, योगिनी एकादशी, शके १९४६
मंगळवार, दि. २ जुलै, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-971022-5-7

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



**ज्या सर्व संतांनी मानवी मनाची हळुवार**
**मशागत करून भक्तीची रोपं रुजवली**
**त्या सर्व संतांना हा भक्ती काव्यसंग्रह**
**विनम्र समर्पित !**

# मनोगत

माणसाच्या क्षणभंगुर आयुष्यात चिरंतन आधाराची एक रेष म्हणजे भगवत्‌भक्ती. काही असो अथवा काहीही नसो, ज्याची साथ हवी असते तोच तर ईश्‍वर. त्याच्यासाठी मनात लीन विनम्र भाव उमटतात ती भक्ती. त्याच्यावरील पवित्र प्रेमाची साक्ष देते ती भक्ती.

भक्ती जशी देवपूजा, कर्मकांडे, व्रतवैकल्ये, उपवास यांसारख्या कृतींमधून उमटते तशीच ती साहित्यातूनही उमटते. संतांचे साहित्य भक्तीरसाने ओथंबून जाते आणि परमेश्‍वरही कौतुकाने लाडक्या भक्ताचे भाव जाणून घेत राहतो जणू !

कवी मनाला कुठला विषय कधी स्पर्शून जाईल, हे सांगणे अशक्य आहे. बरे मनाची धाटणीच मुळी अध्यात्मपूर्ण वातावरणात आणि संस्कारी जीवनात झाल्यामुळे, मातापित्यांच्या अध्यात्मपर जीवनशैलीमुळे भक्ती हा स्थायिभाव होऊन गेला. नीती, अनीती आणि त्यांच्या ईश्‍वरानिष्ठ अधिष्ठानांमुळे तसेच जीवनातील प्रत्यक्ष अनुभूतीने भक्तीचा सुगंध दरवळू लागतो, तसेच माझेही झाले.

अमुक एका ईश्‍वरावर निष्ठा आहे असे मला सांगता येत नाही. ईश्‍वरी तत्त्व सर्वव्यापक आहे, विभू आहे, नित्य आहे, अनादी आहे, अनंत आहे हेच माहीत असल्यामुळे ज्या क्षणी सगुण-साकार रूप मनाला भावतं तेव्हा भक्तिकाव्य आकारू लागतं! कधी निर्गुणाची आराधना करीत त्या तत्त्वाची आळवणी करता काव्य भक्तीत बुडून जातं.

काव्य तरी दुसरं काय असतं? साऱ्या भावभावनांना सामावणारं शब्दांचं जणू आगार असतं. याच भांडारात भक्ती गीतांच्या सांजवेळी तेवलेल्या ज्योतींनी माझाही मन गाभारा उजळून जातो. तो ईश आपला भाग्येश आहे असे वाटू लागते आणि पंढरीनाथाची आळवणी करता करता कधीच अनाथ वाटत नाही.

भक्तीच्या सुगंधातील हे रम्य वातावरण कवितेने सांजवात लावावे असेच उजळून निघते. भक्ती भावनेच्या या नंदादीपांच्या तेजाने जसे कवयित्री म्हणून माझे मन न्हाऊन निघते तसेच रसिकांचेही ! अनेकांनी याबाबत वेळोवेळी तशा भावना कळविलेल्या आहेत आणि म्हणूनच भक्तीचा हा पवित्र अनुभव या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून रसिकांपुढे ठेवताना 'इदं न मम' एवढीच भावना आहे.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

गेल्या २५ वर्षांपासून भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या अन् साहित्यिक व्रत म्हणून गेल्या ६ वर्षांपासून रोज एक काव्यरचना करून प्रसारित करणाऱ्या कवयित्री डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल, श्री. भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पुरस्कार, सन्मान, साहित्यिक, शैक्षणिक, प्रशासकीय, सांस्कृतिक योगदानासाठी अनेक उच्चतम पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. जवळपास १०० पुस्तकांचे प्रकाशन झालेल्या ज्ञानयोगिनी डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा हा भक्तीपर काव्यसंग्रह प्रस्तावनेसाठी माझ्याकडे आला तेंव्हा माझ्या मनात थोडं कुतूहल होतं. प्रत्येक कवितेत भावभावनांचा काय आविष्कार असेल... पण कवितेचं हस्तलिखित हाती पडल्यावर पहिल्याच कवितेनं मी सुखावलो आणि हस्तलिखित कवितासंग्रह पूर्ण वाचून झाल्यावर हा भक्तिगंध मनात दरवळत राहिला.

भक्तीपर काव्यसंग्रहात एकूण ९० कविता आहेत. त्या एका 'जीव रंगला हरीशी' या कवितेत लिहितात...

**एकादशी उपवास, एक जीवन प्रवास,**
**थोडे राहता उपाशी, ताट भरते द्वादशी,**
**त्याच्यासवे वारी ऐशी, जीव रंगला हरीशी,**

अंत:करणातून आलेल्या उत्कट भावभावनांचा उत्स्फूर्त आविष्कार त्यांच्या प्रत्येक कवितेत दिसून येतो. 'मी राधिका प्रेमा तृष्णा' या कवितेत त्या राधा-कृष्णाच्या प्रेमाचे वर्णन करतात.

**राधेकृष्ण रेखिले मी,**
**मेंदी काढून गं हाती,**
**मिळो कृष्ण हाच साथी,**
**राधे जन्मोजन्मासाठी.**

देवांची विविध रूपंही त्यांनी टिपली आहेत. रसिकांना ती निश्चितच भावतील. त्यांच्या कवितेतली कल्पनाशक्तीची आणि भक्तीची वाट स्वतंत्र आहे. राधा आणि कृष्ण, मीरा आणि कृष्ण यांच्या भक्तीच्या भाववेड्या नात्याविषयी डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना एक अपार कुतूहल आहे. या प्रीती भक्तीच्या संवादाविषायी सश्रद्ध ओढही आहे.

भक्तीपर हा काव्यसंग्रह म्हणजे भक्तीरसाचा अमृत कुंभ होय. रसिक मायबाप या संग्रहाचे स्वागतच करतील अशी आशा आहे. बहुत काय लिहिणे.

**नमो शारदे, नमो नमः ।**
**नमो शारदे वागेश्वरी ।।**

**रामकृष्ण बळवंत बुटेपाटील**
मोडी लिपीचे अभ्यासक, मुंबई
माघ शुद्ध १०, शके १९४५
१९ फेब्रुवारी २०१४
राष्ट्रीय (सौर) दिनांक ३० माघ शके १९४५

# अनुक्रमणिका


१) मंजुमंजिरी ... ९
२) वारी निघाली ... १०
३) कुठे गेली ती सकाळ ... १२
४) असं मंदिर मंदिर ... १४
५) वाट पंढरीची चालू ... १६
६) मराठमोळी माय माऊली... १७
७) विठू वारी चालतो ... १८
८) पंढरी माझी काशी ... १९
९) देह तुळशीचं घर ... २०
१०) आज गणराया ... २१
११) राधाश्याम एक ... २२
१२) मीरा जैसी ... २४
१३) गोऱ्ह्यापाशी कृष्ण ... २५
१४) वृंदा होऊनिया राधा ... २६
१५) एक रूप देव होते ... २७
१६) चित्तफुले ... २८
१७) आभाळाची छाया ... ३०
१८) आज देवप्रबोधिनी ... ३२
१९) बिंब हे तेजाळुनी ... ३३
२०) स्वामी केवळ तुम्हीच ... ३४
२१) माया अवखळ ... ३६
२२) काळ्या कातळ पाषाणी... ३७
२३) शिव शिवानी ... ३८
२४) स्मरण तुझेच हे नित्य घडावे ... ३९
२५) घे ना राधिके ... ४०
२६) हो शारदे तू विराजित ... ४२
२७) रूप तुझे माझे ... ४३
२८) माझ्या भोळ्या शंकराला... ४४
२९) वत्स वत्साला भेटतो ... ४५
३०) नको रागावू प्रिये पार्वती... ४६
३१) राम जन्मला ... ४८
३२) उधळण रंगांची ... ५०
३३) तो कृपाळू आहे ... ५१
३४) रूप तेजल सेजल ... ५२
३५) विठाई दर्शनाला ... ५३
३६) रूप अंबेचे ... ५४
३७) श्याम राधेत विरावा ... ५५
३८) रामंच वसतो आहे ... ५६
३९) कृष्ण मधुर गीत हे ... ५८
४०) गाठू म्हायेर पंढरी ... ५९
४१) शंभो करतो तुज अभिषेक ... ६०
४२) अगे शारदा ... ६१
४३) राधेचा होत कान्हा ... ६२
४४) बालरूप हे सत्य शिवाचे ... ६४
४५) कृष्ण राधा एक ती ... ६५
४६) वर दे शारदे ... ६६
४७) शिव लाभतो कुणाला ... ६८
४८) नभ रंग तू ... ७०
४९) तुझ्या सांडण्याला नको भेदभाव ... ७१
५०) अर्ध नारी-नटेश्वर ... ७२

५१) हाक माझी ऐक ना ... ७३
५२) आर्त व्याकुळ
हाक माझी ... ७४
५३) रंग कोणता ... ७६
५४) भाव तिथं देव ... ७७
५५) राधा मिळाली
कृष्णसागरा ... ७८
५६) राधा कृष्ण चरणाशी ... ७९
५७) बालरूप श्रीराम मोहवी ... ८०
५८) मेंदी बाहेरी अंतरी ... ८१
५९) मीच राधिका
प्रेमा तृष्णा ... ८२
६०) प्रेम कृष्ण नाव ... ८३
६१) लीन प्रभुपदी
नित हनुमान ... ८४
६२) प्रेमाचे असे धाम ... ८५
६३) कणकण तुझाच आहे ... ८६
६४) असे पहावे
आत्मरुप मग ... ८७
६५) जीव रंगीला संसाराचा ... ८८
६६) अनंताची आळवणी ... ८९
६७) चित्रकार हा प्रवीण ... ९०
६८) मन कमळ ... ९१
६९) आज हसले गोकर्ण ... ९२
७०) कवाड ... ९४
७१) देवपण ते उजवं ... ९५
७२) वारी रानामंदी करू ... ९६
७३) होय तुळस कळस ... ९७
७४) तीट राधेचे
मोहन काजळ ... ९८
७५) तो मनमोहन राधारंजन ... ९९
७६) जीव रंगला हरीशी ... १००
७७) पांग डोहाचे फिटते ... १०१
७८) दवात दर्शन श्रीरामाचे ... १०२
७९) तू शबरी ना ... १०४
८०) खंडेराय दारी ... १०६
८१) वाहा तू जीवाचे गोकर्ण ... १०८
८२) धडे भक्तीचे ... १०९
८३) विठूला पाहून घ्या ... ११०
८४) विठुरायाच्या पंढरपुरी ... १११
८५) दिव्य रूप सावळ्याचे ... ११२
८६) देवा तुझ्या
पूजेचा सोहळा ... ११३
८७) याची देही याची डोळा ... ११४
८८) प्रतीक राधा केवळ होते ... ११६
८९) विठुमाऊली हो दंग ... ११७
९०) आज नमन
या गुरुराजांना ... ११८



## (१)
## मंजुमंजिरी

राधा वृंदा तुळस होता
पावित्र्याची भाषा झाली
घराघरातील संस्कृतीची
पावन ती परिभाषा झाली

हिरवी पाने गंध दिव्यसा
तुळस राधा शाम राजसा
वृंदावनी हे युगुल नांदते
आत्मप्रेमाचे गूज सांगते

चतुष्पर्ण हे टोक वाढते
चारी दिशांना कवेत घेते
परमेशाच्या पायासाठी
दिशा मंजिरी उर्ध्व चालते

श्रीनारायण तुळस हुंगतो
किती काळही तिथेच रमतो
प्रसाद त्याच्या पुढे ठेवता
तिजपत्राविन नसे सांगता

ती विष्णूच्या मस्तकावर
हारमंजिरी हृदयस्थळावर
तुळशीमाला गळ्यात घालून
वारकरी दिंडीमार्गावर

घेत शिरावर प्रिय वृंदावन
चालत येते विठूनगरी मन
घरून आणली वृंदा वाहून
उजळते विठूमुख घ्या पाहून

बीज तियेचे नाजूक इवले
पानोपानी औषधरस भरले
प्राशन करता जीव निरामय
शरीर होते तेज महालय

रामतुळस वा कृष्णतुळशी
हरिप्रिया ठेवा दाराशी
अंगणातल्या वातावरणी
विष्णू लक्ष्मी स्थिर उंबऱ्याशी

कार्तिकमासी परिणयवेदी
विष्णुप्रियाही तुळस बावरी
राधा दामोदर विवाह वेळी
मोहोरून आली मंजुमंजिरी
मोहोरून आली मंजुमंजिरी

दि.१३/७/१९
दु .४.२५ वा



## (२)
## वारी निघाली

वारी निघाली निघाली
सवे सारे वारकरी
मार्ग चालती पाऊले
ध्येय पंढरी पंढरी

वारकरी धुंद नाचे
भक्तिसुगंधात न्हात
पाठीशी राहतो त्याच्या
विठुरायाचाच हात

संसाराच्या गराड्यात
जीव रोज गुदमरे
श्वास विठू जेव्हा होतो
आत्मानंदाचे धुमारे

संकटांचा इहलोक
सुख खरे त्याच्या पायी
वैकुंठाचा राजा इथं
भक्तापायी उभा राही

पायवाट जाते तिथं
जिथं विठुमाऊली ही
रखुमाई सवे बाप
जगताची साऊली ही

एक वीट ही पायाशी
गोडी अवीट भक्तीची
कर कटीवर ठेवी
ठेवा चैतन्याचा दावी

भक्तासाठी चाकरीही
करण्याला स्वामी धावे
त्रैलोक्याचा नाथ येथे
भक्ती आनंद हा पावे

वारीसाठी वारकरी
दिसमासी वाट पाहे
इहलोकीच्या देवाला
देहकुडी वाहताहे

मन त्याच्या चरणाशी
जळी स्थळी तोच आहे
लाख नयनांनी देव
माझ्याकडे पाहताहे

टाळ मृदंगाची साथ
रिंगणाची ओढ लागे
गोल पिंगा ब्रह्मानंदी
जीव वारू शांत वागे

आता आषाढी कार्तिकी
सोहळ्याचा रोमहर्ष
डोळा पाहता विठूला
आयुष्याचा हो उत्कर्ष

कीर्तनाचा सूर कानीं
गात अभंगाची वाणी
विठुरायाच्या राऊळी
तीर्थ तुळशीचं पाणी

ज्ञाना तुका नामा जना
चोखा गोरा न सावता
संतजन मांदियाळी
देव देवाला पावता

त्याचं रूप कसं दिसे
वर्णायाला नाही शब्द
विठू दाखवी आरसा
आत्मा विठू निर्विवाद

वारी अशी गा सफल
जन्मवारी चुकविण्या
माझा सूर राहो सुरी
विठू गुणगान गाण्या
विठू गुणगान गाण्या

दि.२५/६/१९
सकाळी १०.४० वा



## (३)
## कुठे गेली ती सकाळ

कुठे गेली ती सकाळ
आता दिसतंच नाही
देवपूजेसाठी फुलं
घ्यायला कोणी नाही

आधी असे सोहळा
सकाळराणीचा
पहाटेच्या गोड क्षणी
झोप सोडण्याचा

उठताच आधी
देवघरापुढे उभा
राहूनिया नजरेने
देव पाहण्याला

सारं काही त्याच्या
कृपेमुळे आज आहे
अशीच कृपा राहो
हे त्याला सांगण्याला

घरादाराची झाडून
स्वच्छता होई
दारापुढे सडा रांगोळी
सजून जाई

श्लोक उच्चारणा सवे
मंगल ते स्नान
साऱ्या नद्या होत गोळा
होता आवाहन

स्नानातून येई शुद्ध
पावित्र्याचा वास
केस धुतल्या आईचा
पसरे सुवास

छान साडी नेसून ती
अंगणात जाई
हातातल्या परडीत
फुलं गोळा होई

जाई जुई प्राजक्त नि
बकुळ सावळा
सदाफुली मोगरा नि
गुलाब पिवळा

तुळशीची मंजिरी
गोपालकृष्णासाठी
गंधभरा मरवा नि
आंब्याची ही फाटी

झाडावेळींजवळ ती
जाता हळुवार
आपसुक देती फुलं
त्याही अलवार

मग आई पूजेसाठी
अंगणात जाई
संस्कृती घराची पूजे
तुळशी ही माई

प्रदक्षिणा घालताना
वर मागतसे
सारे तिचे पावित्र्य
जीवनी आणतसे

मग होते घरामध्ये
देवपूजा मोठी
स्तोत्र, मंत्र, नैवेद्य नि
धूप, पंचारती

सारेजण आरतीला
सोबत जमती
घर सारे देवांच्या
सेवेला दिमती

मग आनंदाने सारे
प्रसाद भक्षिती
कुळपरंपरा
मिळूनिया रक्षताती

तळहाती तीर्थ येता
भक्तिभाव जागा
मनातल्या मनात
साऱ्यांसाठी सुख मागा

कुठे गेली सकाळ ही
शोधून थकले
परक्यांच्या मागे जाता
भारतीयत्व विकले
भारतीयत्व विकले

दि.२९/६/१९
सायं:७.१५



## (४)
## असं मंदिर मंदिर

असं मंदिर मंदिर
भवताली ते डोंगर
आत राहतो शंकर
होई शिवाचा गजर

वैशाखात रुसलेला
निसर्ग गडप झाला
भोळ्या महादेवाने की
विरक्तीचा नारा दिला

माझी सती भस्म झाली
अग्नीने तिला गिळली
वैशाख वणवा हा
शिवमूर्ती समाधीत गेली

किती युगे उलटती तेव्हा
गिरिपोटी कन्या प्रकटली
शिवस्मरणामध्ये तीही
गतजन्माची स्मृती उमटली

मिळविण्या पुन्हा पतिराजा
तपाचरणी सीमा झाली
पार्वती जिवा आटविते
पंचाग्नीत काया जाळी

ही सारी उष्णता तेव्हा
वैशाखाने रिचविली
मग वसंत धावत आला
धरती नवी नवेली

कामदेव देवांचा दूत
शिवसमाधी भंगित करण्या
पंचशर प्रसिद्ध धनुषी
शिव क्रोधे लाल झाला

उघडुनी नेत्रास तिसऱ्या
क्रोधाग्नीत मदन जळाला
भस्म होताच तेव्हा
रतीविलाप कानी आला

उ:शापे मनात जागा
जगताच्या कामदेवा
पार्वती मिळाली शिवाला
शिवशक्ती संगम झाला

आता वसंत फुलला
डौलाने डोंगरी डुलला
झरे धबधबे झाले
ऋतू वर्षावाचा आला

शिव संसाराची गाथा
वन फुलून जाईल आता
रानफुलास जाग येता
कडे कपारी रंगात न्हाता

राऊळी भक्तीची घंटा
वाजताच नाद हा घुमतो
प्रतिध्वनीतून परिसर तो
शिवशंकर चरणी रमतो

दरवर्षी येतो वसंत
शिवशक्ती महती सांगत
मंदिरा चढवुनी साज
सेवेत शिवाच्या दंगत

वर्षाकाळीचे दर्शन
भक्तीसुखाचा पाऊस
शिवकृपेने होऊन चिंब
मुक्तीची गाणी गाऊत
शिवदर्शनाला जाऊत

दि. ३०/६/१९
सायं ५.५१ वा.



## (५)
## वाट पंढरीची चालू

वाट पंढरीची चालू
वारकरी ऐसे होऊ
भुवरीच्या वैकुंठात
कीर्तनी विठूला पाहू

आषाढीच्या सोहळ्याचा
अंतरंगी उपवास
डोळाभरू पाहू त्याला
मनगाभारी सुवास

रूप सावळ्याचे दिव्य
साठवावे आत्मलिंग
परमात्मा भेटता
चेतून उठे स्फुल्लिंग

संसाराची नश्वरता
चिरंतन विठुराया
देह होडी तो नावाडी
इहलोक तरू जाया

चिंता चंद्रभागी सोडू
सत्त्वभावे भरला गडू
आत्मानंदाचे जल उडवू
जीवनाचे जीवन घडवू

माझे मीपण गळावे
एकरूप त्यासी व्हावे
विठुमाऊली चरणाशी
स्वर्गसुख तेचि पहावे

जीव मंजिरी वहावी
भावचंदनाची उटी
आत्मरुप कर कटी
भेट ऐशी बा गोमटी

दि. २८/६/१९
दुपारी २.४० वा




## (६)
## मराठमोळी माय माऊली

मराठमोळी माय माऊली
तुळशीला पाणी घाली
मंजिरी वाहण्या नारायणाला
रखुमाई गृहिणी झाली

अंगणातले वृंदावन
तुळशीभोवती फिरते मन
सडा रांगोळी काढून झाली
भक्ती जळाने न्हाऊन आली

वस्त्र रेशमी नऊवारी
लेऊन संस्कृती सारी
टिळा कपाळी नासिकेत नथ
भरला चुडा शोभे हात

दागदागिने परंपरा
आंबाड्यातून सोनतुरा
हाती कलश पडती धारा
तुळस येते अशी बहरा

तिच्या मंजिरी तुळशीहारा
श्रीविष्णूच्या गळ्यात घाला
राखुमाईचे प्रेम पाहुनी
विठू सावळा गलबलला

दि. ६/७/१९
सकाळी ९.५७ वा.



**(७)**

## विठू वारी चालतो

विठू वारी चालतो
टाळ चिपलीळीतून बोलतो
विश्वाचा हा नियंता
भक्ता घरी राबतो

त्याची वारी भक्तासाठी
विटेवरी उभा जगजेठी
सगुण निर्गुणाचा तिढा
तोच सारा वाद सोडा

आत्मलिंग परब्रम्ह
नारायणीसह आले
चंद्रभागा नदी तीरी
भक्तीत नहाले

विठू माऊली झाली
भक्त लेकुरे त्याची
रूप ज्याला दिसेलना
पुण्यगाठी संचिताची

वारी चाले दो अंगी
तोही भक्ताघरी जाई
वैकुंठाचा राजा इथे
अनाथांचा नाथ होई

भूवरीच्या पंढरीनाथा
चित्त लागो तुझिया चरणा
संसारीच्या गलबली
चिदानंद अभिवरणा

एक वारी ऐशी व्हावी
साऱ्या वाऱ्या चुकवाव्या
चौऱ्याऐंशी फेऱ्यामधुनी
मुक्तिकण वेचावया

ज्ञानराज व्हावे अथवा
व्हावे वारकरी आज
विठोबाच्या चरणी वाहू
भाव भक्तिरुपी साज

दि.९/७/१९
पहाटे ४.२० वा.



## (८)
## पंढरी माझी काशी

पंढरी माझी काशी
पंढरी द्वारकेशी
रामेश्वर हे पंढरी
इये संतांची नगरी

दोन वाऱ्या वर्षातून
नाही कशाची जरुरी
किती देऊ घेऊ आपण
सारं पडलं अपुरी

सारं जीवनचं माझं
पंढरीच्या नावे केलं
आली फळाला पुण्याई
विठूरायानं बोलावलं

घाम गळता शिवारी
फुले चैतन्याचा मळा
वृंदावन कृष्ण इथं
तुळशीमाळ त्याच्या गळा

विठू टिळा चंदनाचा
शांत वणवा तमाचा
सावळ्या रूपाचा प्रकाश
करी अंत अज्ञानाचा

सारे तीर्थ चंद्रभागा
स्नान इथंच आवरा
काम क्रोध लोभ माया
गर्त संसारी भवरा

व्रत व्रतांचा सुवास
एकादशी उपवास
होई त्याच्या कृपेनेच
सोपा वैकुंठप्रवास

कशाला जाऊ काशी
कशास द्वारकेशी
तुटता सारे बंध
स्वर्ग उभा की दाराशी

दि.१०/७/१९
सकाळी १०.३० वा.



## (९)
## देह तुळशीचं घर

देह तुळशीचं घर
भावमंजिरी मोहोर
दिंडी व्हावी हा संसार
ध्यास पंढरी माहेर

नको अहंभाव देवा
नको षड्रिपु चावा
पायी एकमेका व्हावा
लीन झुकलेला माथा

खांद्या राहो एक झोळी
गरजेची करुनी मोळी
मुखी नाम तुझे देवा
मूर्त हृदयपाकळी

ध्वजा वैष्णवांची हाती
इथं सारी नातीगोती
तुळशीची माळ गळा
बुक्का केशराचा टिळा

टाळ हाताशी वाजतो
नाद त्रिखंडी गाजतो
मुखी हरीनाम घेता
विठू भजनी नाचतो

दिंडी चालता हो वारी
वारी जातसे पांढरी
वैकुंठाचा राजा इथं
उभा सावळा श्रीहरी

त्याला डोळाभर पाहू
चरणाशी थोडं राहू
चंद्रभागी भक्तिजळ
चिदानंद डोही नाहू

संसार सासुराचे
कष्ट माहेरी न नेणे
न सांगताच माउलीनं
सारं सारं ते जाणणे

आता संवाद ही पूजा
नाद जिवा नाही दुजा
सत्त्वभावाचा मोहोर
ऋतुराज विठुराजा

दि.९/७/१९
सकाळी ७.३० वा.




## (१०)
## आज गणराया

आज गणराया
आगमन तुझे
चित्त तुझ्या पायी
सदा राहो माझे

विद्येची देवता
तू विघ्नहर्ता
सुखांचा कारक
तूचि स्वामी कर्ता

कला अधिष्ठान
रूप ते महान
बुध्दीरूप देवा
तूचि गजानन

प्रथम पूजेचा
तूचि मानकरी
देवाधिदेवा तू
दुःख दूर करी

मातृभक्ती तुझी
अलौकिक आहे
सिद्धीचा दायक
सिध्दीविनायक

मोदक आवडी
भक्तप्रिय गोडी
संसार बंधने
पाश देवा तोडी

दि.९/९/१९
दुपारी १२.४१ वा.



## (११)
## राधाश्याम एक

सांग राधे काय देऊ
मी तुला सखी गं
श्याम पुसतो गूज अवचित
बोल मजसी गं

प्रासाद तुजला देऊ का
बांधून सुंदर रम्यसा
सारी सुखे हसतील तेथे
चरणी तुझिया राहता

का सखे मी भूषणे
देऊ तुला कोरीव गं
रत्न जडले, स्वर्ण घडले
आभूषणे ती भरीव गं

सांग राधे तव पदी
ऐश्वर्य आणीन स्वर्गीचे
जे जे हवे ते तुजसी मी
देईन बघ इहलोकीचे

आकांक्षा काही बोल ना
मनीषा तुझ्या तू सांग ना
संकोच नसू दे तव मनी
काहीतरी तू माग ना

वस्त्रे ऐसी दिव्य देईन
तलमता स्पर्शात गं
रूप निरखून घेशी तू
पुनः पुन्हा आरशात गं

अजूनही अबोल तू
पाहसी मजला अशी
सेवा तुझी करू दे मला
तू करीशी नित माझी जशी

ऐक सखया, चित्तचोरा
कामना ना ऊरल्या
तू दिल्या आधीच मजला
ओंजळी सुखं भरल्या

वेळ मजला दे सदैव
पाहू दे तुज सारखे
सहवासी सुख मजला
होऊ ना दे पारखे

नेत्री वसू दे तूच कृष्णा
चित्ती तू राहो सदा
तू मनाने होशी माझा
हीच माझी संपदा

वस्त्रं, भूषण, प्रासादांचं
सांग मजला काय ना
तू जवळी मज असशी तर
सारे उपाय ही तूच ना

राधेला घे सामावुन तू
राधाश्याम हो एक ना
वाहिला मी जीव तुजला
श्याम होऊ दे मला

दि. ३०/७/१९
सकाळी ७.२६ वा.



## (१२)
## मीरा जैसी

मीरा तुझ्या भक्तीसाठी
श्याम विष प्याला
प्याला जरी विषाचा
तो अमृतची झाला

श्वास तुझा हरी असे
अन्य काही तुला न दिसे
जगरीत  विसरुनी सारी
श्यामरूप तू होत असे

मिटशी नयना तो श्याम दिसे
यातना नच, तुज श्याम भासे
सुखक्षण दिसले की श्याम वाटतो
कृष्ण मला सांग कुठे न भेटतो

जीव गुंतला असीम भक्तीत
मीरेच्या श्रद्धेच्या शक्तीत
इतकी एकरूप कशी गं झालीस
श्याम सख्याला सामावून गेलीस

अशी भक्त मी कधी न पाहिली
शुद्ध हरपुनी जीवकळीच वाहिली
संसारातून फिरते तुझे ते
नुसतेच शरीर बघ भावविरहीत

वर वर पाहता मीरा गुंगली
ती तर हरिगुणगायनी रंगली
जीवन म्हणजे श्यामच तिजला
विष द्या अथवा अमृत प्याला

भजन तिचे मग शब्दधुंद ते
भक्ति रसाने होत चिंब ते
श्याम वाहतो भजनामधुनी
श्याम ऐकू ये गायनामधुनी

श्याम दिशा, श्यामच आशा
श्याम प्रतीक्षा, श्याम मनीषा
जगणे श्याम, मरणे श्याम
श्वासावरती कोरणे श्याम

काही न ठाऊक त्याविन तुजला
अशी मीरा तू कळली मजला
भक्ती कशी बघ दिसेल शरीरी
मीरा जैसी असेल गहिरी

दि.५/८/१९
दुपारी ४.५७ वा.



## (१३)
## गोऱ्ह्यापाशी कृष्ण

काय म्हणावे या नात्याला
गोऱ्ह्यापाशी कृष्ण पहुडला
किती सुखाचे क्षण देवाचे
वासराचा देह सुगंधला

गोवंशाशी अतूट नाते
श्रीकृष्णाचे जडले होते
गोपालक हे नाव तयाने
अभिमाने मिरवीले होते

आज पुन्हा हा कृष्ण इथे
निवांत बसला बालरूपे
कामधेनूही पुत्र पाठवी
सेवा करण्या ह्या अवतारे

संकट झाले आणीबाणी
नदीला पूर डोळा पाणी
जीव वाचवत नेई कोणी
पाठीवरूनी बाळ गोधनी

रूप किशोर गिरीधर वाटे
पाठी बसुनिया जीव वाचे
असती वाचा बोलले असते
वासरे ऋण गायिले असते

ऋणानुबंध पाहून ऐसे
माणुसकीचे दर्शन होते
जीवदया जी श्रीकृष्णाने
शिकविली ती झीरपत येते

रम्य दृश्य हे जिवाभावाचे
नाते वाटते जीव शिवाचे
अन्य कसली पूजा असावी
अनन्य ऐशी कृती घडावी

दि.१०/८/१९
सकाळी८.२३ वा.



## (१४)
## वृंदा होऊनिया राधा

राधे, आज कुंजवनी
झुलू चल झुला
फुलाफुलांनी गं त्याला
बघ सजविला

कोमल ती काया तुझी
भूवरीची माया
प्रकृती नि पुरुषाची
अंतराळी छाया

वासंतिक पुष्पांची
आरास सजवली
खांद्यावरी अलगद
तू मान झुकवली

आज कृष्ण झुकला गं
राधेसाठी माझ्या
एकरूप चित्त एक
मनी राहतो मी तुझ्या

मुद्रा तुझी माझी अशी
युगायुगातून
राधा राधा जप चाले
श्याम श्वासातून

काय नाते आपुले
कसे सांगावे कुणाला
शुद्ध प्रेम असता
विचारावे गं मनाला

तू शरीरधारी प्रेम
मी प्रेमधारी श्रीहरी
प्रेमगीत गाऊनी
साथी होय बासुरी

उंच जाऊ दे झुला
पाहिलेस तू मला
झोकुनिया माझ्यावरी
जीव तुझा वाहिला

श्याम देई वचन तुला
विवाहाचा क्षण आला
वृंदा होऊनिया राधा
दामोदर भेटण्याला

दि.१०/८/१९
२.२३ वा.दुपारी



## (१५)
## एक रूप देव होते

एक रूप देव होते
बाळकृष्ण गोकुळाते
वासराच्या संगे नाते
डोळे बासरीच होते

दही दूध तूप लोणी
खाई अंगासी माखोनी
देह सार गोरसाचे
कृष्ण गोरसात वसे

काय पाहतो मुखास
तोची जाणे हरिभास
मिळे शांतता सुरेख
गाईच्या वासरास

जसा कृष्ण वाढताहे
दिसामासी गोकुळात
गोकुळेही गोधनाने
पुष्ट नितही होतात

नंद काळ उलटून
गेला कसे ते म्हणावे
अंगणात प्रत्येकाच्या
बाळकृष्ण खेळताहे

गोठ्यामध्ये गाय राही
वासराला ती चाटत
बाळ माणसाचे जाई
वासराला की भेटत

मैत्र जीवाचे युगाचे
कधी संपणार नाही
असे क्षण ह्रदयात
घर करतील काही

दि.२०/८/१९
दुपारी ३.१४ वा.



## (१६)
## चित्तफुले

मूर्त तुझी कृष्णराया
मनमोहक मनमोहना
मुरली तुझी सूर देई
भक्तीरस बोल भजना

पद वळवीशी लीलया तू
ओठी बासुरी विसावे
रूप तुझे संगीतात
रंगुनी मधूर व्हावे

कमलनयन मिटुनी उभा
सूर आळवीत जरा
सृष्टी होय साजरी
रूप मदन गोजिरा

मानवीय अवतार
विष्णू जिष्णु सावळा
गोकुळात नांदला
जीवभाव कोवळा

असुर संहारण्या
बुद्धिमती प्रेरणा
स्नेह भक्ता दाखवी
भक्ती हीच धारणा

कार्य किती साधले
दुःख तूही भोगले
जन्मदाते असून परी
प्रेम झाले पारखे

नाते विश्वनाथा रे
रक्ताचे कशास ते
लावीशी लळा असा
नाम गे दिशास ते

कर्म गीता गायिली
पार्थ शिष्य दास जो
समरी देव सारथी
जीवनाची आस जो

मूर्त तुझी देखणी
अष्टभाव उन्मळे
कृष्णसख्या मन आमुचे
होत जाय देवळे

तू तिथे, तू जिथे,
तू कुठे राहसी
दृष्टी कृपाळू सदा
प्रेमभरे पाहसी

चरणी तुझ्या चित्तफुले
रोज भावे वाहतो
वर्षा तुझी बरसू दे रे
मुक्ती इथे मागतो

दि.२२/८/१९
सकाळी ११.४१ वा.



## (१७)
## आभाळाची छाया

आभाळाची छाया अशी
शिरावर राहो
आरसा हा धरणीचा
नितळ नितळ आहो

जळी त्याचे प्रतिबिंब
मोहक वाटावे
अंधाराचे जाळे बघा
क्षणात फिटावे

काय काय उदरी त्याच्या
ब्रम्हांड सारे
चमचमत्या चांदण्या नि
ग्रह गोल तारे

मार्ग व्योम होत जाय
धरा स्वर्गाचा
पथिक खग येती उडत
ठाव मर्माचा

रंग किती सुंदरसे
छटांचे आंगण
केशरी, निळ्या, राजस
रंगांचे ते रिंगण

इंद्रधनू उमटते
जरासे लाजून
प्रेयसीस पाहते की
असे वाकून

उंच उंच शिखरे जाती
चुंबीण्यास त्याला
रम्य निसर्गाचं देणं
लाभलं आभाळाला

कृष्णमेघ दाटतात
जळ भरले जेव्हा
वर्षावाने सुखावते
धरणीमाय तेंव्हा

मेघकांता विद्युलता
चमकते मधेच
आकाशात तेजरेख
लखलखते एक

सूर्य उगवतो नि
तेज पसरतो प्रकाश
गर्भात रात्रीच्याही तेथे
चंद्र देई साथ

रात्र पौणिमेची रसिक
वेडावून जाई
प्रियतमेच्या केसातून
चांद जाईजुई

चातक, चकोर सारे
नभा पाहताती
अर्घ्य कोणी इथून त्याला
श्रद्धे वाहताती

कोपावता मार्तंड तो
ताप झाकविण्या
मेघा आणून नभ
धरती दिलासण्या

प्रियजन सोडून जात
आकाशी चांदणी
आठवांनी अश्रू गळती
हृदय गोंदणी

आभाळ भरून येई कधी
झाकोळते सृष्टी
कधी नभा पाहताच
ओलावते दृष्टी

बाप आभाळचि होई
माय धरणी
विशाल हे मन करावे
स्वच्छ करणी

गगनाला साद दे
आकाश ठेंगणे
अनंत ईश्वराचे
तेची रूप सांगणे

कृष्ण सावळा नभात
पाहतात जे
आकाशगंगा त्यात
मुक्त वाहतात रे

क्षितिजावर मीलन
धरतीसवे कधी
रम्य सुंदराचे भास
तत्त्व अनादी

दि.२६/८/१९
सकाळी १०.११ वा.



## (१८)
## आज देवप्रबोधिनी

आज देवप्रबोधिनी
एकादशी तुझी देवा
निद्रेतून जागण्याची
सवय ती व्हावी आम्हा

उगाच नाना तंद्री
मनास कामक्रोध
आम्ही सदाच हो गर्क
मद मोहाच्या झोपेत

विठुरायाच्या पाऊली
भक्तिभावाचे साकडे
दोन एकदशा होती
मागणेचि देवाकडे

काय मागू तुज देवा
उपवास की घडावा
वासनांच्या गावामध्ये
देह पंढरी की व्हावा

एक आषाढी आषाढी
भक्ती सरी बरसती
कार्तिकीचे गार वारे
दुःखतप्ता शीतलती

व्रत उदराचे नोहे
आयुष्याचे जिणे आहे
रोज विठू माझा बाई
मज प्रेमे पाहताहे

त्याची आठव क्षणाला
श्वास श्वास तोच होई
रोज आषाढी कार्तिकी
अभंगाची साद येई

तुळशीचे हार त्याला
देता पावित्र्यचि घ्यावे
मनास ओवीमध्ये
रोज ओवत की जावे

व्रत वारकरी व्हावे
विठुसंगती रमावे
भक्तिभावाच्या मंजिरी
दिव्य स्पर्शाने तरावे

दि.८/११/१९
सकाळी ७.२३ वा



## (१९)
## बिंब हे तेजाळुनी

बिंब हे तेजाळुनी
शिवपिंडीवरती वाकले
बिल्वदल होऊन थोडे
नेत्र दोन्ही झाकले

तेजोगोलक हा प्रभाकर
शिवसाधनी रमला पहा
शंकराचा होत किंकर
तेज द्विगुणित ते अहा

देखणे ते बिंब त्या
शिवपिंडही स्वीकारते
तेजासवे जी आरती
किरणाकरे साकारते

नंदीही स्वामीपूजेने
नंदतो आनंदतो
थांबूनी थोडा निवांत
शिंगातुनी त्या सांडतो

ते सूर्यगोलक बिंब त्याच्या
शृंगमध्या सांधते
मस्तकी धरताच त्याने
शिवतेज कानी सांगते

मी तेज पसरीत जातो पण
ते तेज मृत्युंजय सदा
तो शरीरी नांदतो अन्
काळही बघ लांब हा

सहजी कोणी हाती घेऊन
रोपटे इवले जरा
कलिका असता सोबती
मम पुष्पबिंब फुलते पहा

चित्र भासात्मक तसे
मी वाटते जवळी आलो
हाती माझ्या तेजकलिका
क्षणभरी मीही भूललो

जाणतो मी जाणिले
शिवतत्त्व अंतर्बाह्य जे
कृतार्थ मी नारायण
त्रिनेत्री मजला स्थान हे

ते चराचर गम्य आहे
मिळविणे दुर्दम्य आहे
रोज झुकुनी गायिलेले
ज्ञान शाश्वत रम्य आहे

दि.३०/१२/१९
दुपारी २.३१ वा.



## (२०)
## स्वामी केवळ तुम्हीच

स्वामी केवळ तुम्हीच आहात
नाही माझे कुणी
तुम्हाविना कोण जाणेल
डोळ्यांमधलं पाणी

भवसागरात किती
दुःखं भरली
तुम्हामुळे माझी नाव
आहे तरली

पार करताना तुम्ही
धरिला ना हात
तुम्ही मला जाणवता
हृदयाच्या आत

सारी सारी नातीगोती
स्वार्थी इथे
तुम्ही निस्सीम प्रेम
करता खरे

जीव दमतो थकतो
आता नुरले की त्राण
स्वामी तुम्हाचरणाशी
राहो पंचप्राण

मान मिळो अथवा
होवो अपमान
तुमचीच मूर्त
मला आधाराचं पान

तुम्ही देता आधार
कशास डगमगू
प्रेम तुम्ही देता
मी कशास कुणा मागू

कधी कधी स्वामी मला
येई भरते
दुःखंच दुःख दिसे
सुख पारखे

तुम्ही तेव्हा मनाला
देता की उभारी
नको करू चिंता म्हणता
भीती हरता सारी

जीवाचे हे भोग सारे
भोगणेच ना
तुम्ही असता पाठीशी
सुखे जगणेच ना

काय करू समर्पित
तनमनही
स्वामी तुम्ही अंतरात्मा
जीवनही

श्वासा श्वासावर
स्वामीनाम कोरिले
स्वामीमय सारे बाकी
काही ना उरले

दिशा तुम्ही, आशा तुम्ही
तुम्ही मनीषा
जिगीशा, विजिगीशा
नि भावमंजूषा

स्वामी स्वामी आता काही
नको मजला
जीव स्वामीप्रेमामध्ये
चिंब भिजला

दि.३०/०१/२०२०
दुपारी १.३२ वा.



## (२१)
**माया अवखळ**

माया अवखळ आणिक चंचल
मोहक ती लाडिक मधु बाळ
चित्ताकर्षक चाळे तिचे तर
जगजेठी तिचा करतो प्रतिपाळ

ती शक्ती, भक्ती अन अनुरक्ती
डोळ्यात तिच्या भवसागर धार
ओठी फुलवते हास्य मनोरम
मुखी विलसत तेज अपरंपार

वसन देखणे, संसार रेखणे
मोहपाशी अडकवणे हे काम
मनी कुणाच्या असेल श्रीहरी
आणि मुखी त्याचे श्रीनाम

मग ती काही काही न करते
उलट मुक्तीचे रूपही धरते
तिच्या निरागस दैवी लीला
बाळकृष्णरुप सावरते

ती नजर टाकते हरीच्या मुखावर
शांत सुशांत मोहन भाव
अवखळ माया हरखून जाते
त्या पदी तिचा कायमचा लगाव

नको काम क्रोध लोभ मोह माया
राहो मनावर ईश्वरी ताबा
तोच कराला धरून आपुल्या
सांगेल त्या धामाची आभा

म्हणून जिवाने बालक व्हावे
निरागस अवखळ खेळावे
आईभोवती खुदुखुदु दुडुदुडू
मनदर्पणी त्या देवा पहावे

दि.१७/०१/२०२०
दुपारी १२.४१



## (२२)
## काळ्या कातळ पाषाणी

काळ्या कातळ पाषाणी
देव उभा चक्रपाणी
विठू रूपाने सावळा
कर कटेवर दोन्ही

आत पाषाणाच्या होता
देह देवाचा लपला
घाव सोसून टाकीचे
कसा आकाराला आला

मानवाचा देह अशम
मीपणाचा की पसारा
विवेकाच्या टाकीचे ते
घाव पडता उतारा

रूप सावळ्याचे आत
किती चकाके चकाके
आत पाहण्यास मन
शिकवता ते डोकावे

पाषाणही द्रवतोच
किती टणक कठोर
मनी मृदू अध्यात्माचा
येतो फुलून मोहोर

दगडासारखे जिणे
होते अति केविलवाणे
त्यात विठ्ठल दिसता
झाले अभंगाचे गाणे

कुठे बाहेर शोधावा
देव आतची पहावा
दूर फापटपसारा
होता लोचनी वसावा

काम क्रोध लोभ माया
गर्व अहंकार वाया
येता भक्तीचा उमाळा
भक्त मूर्तिकार व्हावा

सारे बाजूला सारून
व्हावे परब्रह्म लीन
आत घडता दर्शन
जीव शिवात तल्लीन

दि.३०/०१/२०२०
सायं ७.२२ वा.



## (२३)
## शिव शिवानी

शिव शिवानी पदकमले ती
शुभंकर अन वरदायी !!१!!

जिच्या विना शिव शव हा ठरतो
शक्ती तीच उत्पत्ती
तीच शिवाची अर्धांगिनी

शिव शिवानी पदकमले ती
शुभंकर अन वरदायी !!२!!

जगदाधार पार्वती शंकर
शक्ती मुक्ती भुक्ती दातार
शुद्धाशय पावन चरणे ती

शिव शिवानी पदकमले ती
शुभंकर अन वरदायी !!३!!

दि.१३/११/२१
रात्री ०८.२१ वा.




## (२४)
## स्मरण तुझेच हे नित्य घडावे

स्मरण तुझेच नारायणा
तूच मनाची शुद्ध धारणा
तुझ्या भक्तीची शक्ती मिळता
उणे न उरते सारी पूरणा

आयुष्याचा तू आधार
तुझ्यामुळे सारे साकार
तुजवीण व्यर्थ फुकाचे सारे
सारे मानवी बघ व्यवहार

स्मरण तुझेच श्वासासंगे
जीव शिवातच मग हा रंगे
कृतिकृतीतून समर्पणाचा
भाव श्रीहरी तव चरणी सांगे

सत्कर्माची वाढे राशी
नित्य वहावी पदकमलाशी
तुझ्या स्मरणमात्रे मज लाभे
पुण्य मथुरा द्वारका न काशी

स्मरण तुझे मज निमिषे व्हावे
माझे मीपण विरून जावे
कणाकणावर ज्याची सत्ता
त्याला स्मरणातून पहावे

स्मरण तुझेच हे नित्य घडावे
स्मरण तुझेच हे नित्य घडावे

दि. ०१/०४/२०२२
सकाळी ०८.१८ वा.



## (२५)
## घे ना राधिके

घे ना राधिके कोमल हाती
प्रिय ही माझी वेणू बासुरी
देह हिचा वेताचा जरीही
सूर सजीव ही छेडत राही

श्वास देतो मी हिच्यात भरुनी
जगण्यातून ही सूर पेरता
सप्तसुरांनी छेडून तारा
गात राहते राधा राधा

मी हिला विचारी, असे कसे गं
मी तर सारे सा रे गातो
निज प्राणांनी तुला फुंकता
सूर राधेचा कसा हा येतो

सांगे मंजुनादे ही बासुरी
देवा आधाराची मी भुकेली
तू तर अधरी स्थान देऊनी
निज श्वासांनी भरली ही कुडी

मजवर केले श्वास उधार
कसे फेडू मी हे उपकार
हृदयातून येतील जे देवा
तुझे प्रेमसुर अंतर्याम

त्या सुरांना मीच जाणते
राधा राधा कोरून येते
आत घेशी तू देवा तिजला
निःश्वासातही तीच वाहते

जरी ओठी मी बिलगून राही
आठही प्रहरी राधा पाही
जळी स्थळी तुज दिसे राधिका
देवा तव हृदया मी पाही

देह तुझा जरी माझ्याजवळी
चित्ती तीच बघ क्षणाक्षणाला
कधी वाटते राधा बासुरी
बिलगून मजला जाणीशी तिला

राधा होणे मज ना नशिबी
तरी तुझे ते प्रेम मिळाले
राधेसाठी तू मजजवळी
एवढेच मज भाग्य लाभले

एकदा हरी ऐक माझेही
लाव बासुरी राधेअधरी
सांगीन तिजला प्रेम तुझे ते
क्षणाक्षणाला अधीर कितीतरी

तिला सांगणे तीच हरीमनी
सूर असू दे अथवा गाणी
राधा राधा गातो श्रीहरी
अंतर्मनीही राधाराणी

तोऽऽ एकटा कधीच नसतो
असशी संगे तूच राधिके
मी तर केवळ साधन होऊन
गीत तुझेच ते छेडीत जाते

अलौकिक हे प्रेम विराळे
कधी न पाहिले असे निराळे
देह वेगळा वाटे तरीही
राधा श्यामच श्याम राधळे

तुझ्यासारखे येवो समर्पण
मजला तव सेवाही लाभू दे
राधे ऐसा वर तू द्यावा
दोघांमधले सूर मी होऊ दे

सूर सुराला भिडू दे ऐसा
राधाश्याम ही दुनिया व्हावी
सायंकाळी यमुनेमध्ये
प्रीततरंगी होडी वहावी

आज जी हसली राधा गाली
बासुरीस ती चुंबून गेली
हरीच्या प्रेमासाठी काष्ठ ही
चंदन होऊन गंधून गेली

दि.१७/०५/२०२०
दुपारी ३.११ वा.



## (२६)
## हो शारदे तू विराजित

हो शारदे गे तू विराजित
मज मुखी जिव्हाग्री या
वाणी ऐशी मधुर द्यावी
जीवनाला सार्थ करण्या

तू प्रभू, तू ईश्वरी
तू ज्ञान, तू ज्ञानेश्वरी
तू चांदणे शीतल असे
तू शब्दब्रह्म नि शर्वरी

विद्या तुझी ही अंगिते
साऱ्या कला अभिनय तुझा
एक वीणा छेडणारी
संगीताच्या आत्मजा

शुभ्र वसने श्वेतधवला
हास्य तव रस निर्मिती
त्या स्मिताचे चांदणे की
साहित्य सारे जन्मती

भाव सारे तव मुखावर
शब्द मयूर ही नाचती
कमल आसन हो प्रसन्ना
शारदेची हो स्तुती

हंस आहे की प्रतिक तो
मंत्र सोहम् सांगण्या
आत्म अध्यात्मात मतीला
तू कृपा कर बांधण्या

तू अशी वसशी की स्वर्गी
कल्पनेला रंग दे
पामरा मज या कवीला
शब्द अंग नि संग दे

तू सहित असताच होईल
ते खरे साहित्य ही
मी उगा वाहीन भारा
वरदान लाभो नित्य की

दि.१६/०५/२०२०
रात्री ९.४१ वा.



## (२७)
## रूप तुझे माझे

रूप तुझे माझे येथे
एकवटून आले
पूजण्यास मातापित्या
गणराज झाले

आदिदेव ठरला बाळ
कौतुक मनाला
तोषवितो त्या लीलांनी
असा त्रैलोक्याला

तो गुणेश आहे आणिक
गणेश विद्यानाथ
साऱ्या कलांचा तो स्वामी
असुरांचा काल

नित्य करी पूजा आपुली
रूप बालकाचे
जन्मदात्याहून ना मोठे काही
सांगणे तयाचे

बिल्वदले शुभ्र फुले
वाहतो शिरी तो
श्रद्धाभावे प्रेमजलाचा
अभिषेक घडवितो

शालंका मी शिवपिंडी तू
गणराज पुत्र
सत्त्व रज तमाचे हे
देखणे की सूत्र

दि.२०/०५/२०२०
सकाळी१०.११ वा.



## (२८)
## माझ्या भोळ्या शंकराला

माझ्या भोळ्या शंकराला
नको उन्हाचा तो त्रास
चला बेलाची करूया
त्याच्या पिंडीला आरास

सारी शाळुंका सजावी
त्याची पार्वती ती राणी
हिरव्या कोवळ्या पानांची
बेलपालवी पसरुनी

बेल औषधी गुणांचा
त्याच्या अंगी शीतलता
रुद्र तमोगुणी देव
त्याचा क्रोध नावरीता

करी तांडव रागाने
सृष्टी हादरून जाय
अग्नी संचारला देही
देव लाही लाही होय

बेल धावतो मस्तकी
देवशरीरी नि पायी
देत थंडावा तयाला
प्रिय शंभुला तो होई

पिंडीवर लक्ष पानं
कुणी भक्त वाहताती
मनोकामना तयांची
शिव मोदे पुरविताती

एक पान जरी हाती
नाही रिक्तहस्त कोणी
जाई इथून शिवाच्या
आशीर्वादाची पर्वणी

शिव बेलासाठी जागा
बेल शिवासाठी जगे
भक्त देवाचे अनोखे
असे दोघांचेही नाते

दि.२४/०५/२०२०
दुपारी ३.२७ वा.



## (२९)
## वत्स वत्साला भेटतो

वत्स वत्साला भेटतो
जीव कृष्ण जणू होतो
तो गोपाळ गोपाळ
प्रतिपाळ तो करतो

त्याचे स्थान कुठे आहे
साऱ्या चराचरी पाहे
मस्तकी तोच राहे
रुधिरातूनही वाहे

त्याची मुद्रा ती प्रसन्न
देही तोच की अभिन्न
प्राण म्हणतात ज्याला
त्याचे रूप ते अक्षुण्ण

गोविंदाचा लळा लागो
लागो त्याचाच हा छंद
सूर बासुरीचे होती
भक्ती वाहते की मंद

कैवल्याच्या चांदण्यात
तीर जीवन उजळे
कृष्ण सावळा हरी हा
नयनी रूप हे काजळे

जीव वासरू वासरू
हंबरून त्या पुकारी
कृष्ण माय होत आला
वत्सा तारण्या श्रीहरी

दि.०३/०६/२०२०
दुपारी १२.१४ वा.



## (३०)
## नको रागावू प्रिये पार्वती

नको रागावू प्रिये पार्वती
कशास नाराजी ही तुझी
तूच प्रिय सती तूच उमा अन्
तपती अपर्णा अर्धांगिनी

नको रुसू तू शिव हा तुझाच
तुलाच सत्व समर्पिले
गंगा जगकल्याणासाठी
जटेत तिजला स्थापियले

ती आवेगे वेगेवेगे
जर पृथ्वीवर अवतरली
असती तिच्या शक्तीने सारे
मानव अवनीही थरथरली

म्हणून जटेत या मंदाकिनीला
स्थान दिले मी देवकार्य म्हणून
तू शंकर हृदयाची स्वामिनी
तुझे स्थान गे कणकणातून

किती शक्तीचा स्रोत वाहतो
तू दानवमर्दिनी शूरिणी
तुझ्याविना मी अपूर्ण आहे
शक्तीविना शिव शव मानीनी

ती गंगा ना सवत तुझी गं
जटेतून वाहती जलानी
तूच शांभवी शिवप्रिया ही
चित्तामध्ये असे शिवानी

लक्ष न माझे तिच्याकडे ती
पवित्र गंगा स्वर्गगामिनी
कुणी भगीरथ अविरत तपतो
सगरपुत्रा ती संजीवनी

त्याचे कठोर ते तप पाहता
गंगा अवतरणे हे निश्चित
युगंधरेवर साक्षात जर ती
अवतरली तर होईल अघटित

संकट करण्या दूर असे मी
उपाय केवळ दिधला आहे
ती माझी ना कोणी राणी
तू प्राणांहून मज प्रिय आहे

काय करू मी सांग तू आता
प्रेम सिद्ध हे करण्यासाठी
तू निराश अन रुसतेस जेव्हा
खंडित मन अन मज साधनाही

सोड तू रुसवा बस जवळी मज
या मांडीचे आसन करी
तुझ्याविना ना असणे माझे
तुझ्या शिवाला तूच सांभाळी

या शिवाला पारख कधीही
शिवपार्वती ही जोडी अनुपम
मी तनमन आत्मन हे वाहतो
शिवबिल्व दलाचे हे समर्पण

दि.०६/०६/२०२०
दुपारी ४.१५ वा.



## (३१)

### राम जन्मला

देखीयले रूप तुझे,जन्म तोषला
राम जन्मला अयोध्यी राम जन्मला ।।धृ.।।

चैत्र मास नवमीदिनी सूर्य अवतरे
अवताराचे जे कार्य दैवे योजिले
तेजोगोलकची जणू हा चमचमचमला
विष्णू बालरूप पहा राम सावळा
राम जन्मला अयोध्यी राम जन्मला ।।१।।

वीर रघुवंश तेज वारसा दिला
कौसल्या दशरथास बाळ लाभला
तरसले जे नयन रूप पाहण्या मुला
पुत्र पाहुनिया येई पुण्य फळाला
राम जन्मला अयोध्यी राम जन्मला ।।२।।

मातृपितृवचन बंधुप्रिय सखा खरे
राजकुमार हा धीरोदात्त वावरे
प्रजावत्सलता त्याच्या मनी पाझरे
दिव्यरूप अभिराम राम जाहला
राम जन्मला अयोध्यी राम जन्मला ।।३।।

दुष्ट दुर्जनासी कली काळ तो ठरे
गुरुवंदन कर्तव्ये प्राणप्रिय बरे
एकपत्नी एकबाणी वचन एक रे
राज्य कसे असावे हा पाठ घातला
राम जन्मला अयोध्यी राम जन्मला ।।४।।

उद्धरण्या कैक जीव सहे यातना
स्थितप्रज्ञ देव जणू दुःख भोगण्या
आदर्शाचा हा वस्तुपाठ पाहण्या
हनुमंत स्वामी सीताकांत शोभला
राम जन्मला अयोध्यी राम जन्मला ।।५।।

दि.१०/०४/२०२२
दुपारी ०३.३३ वा.




## (३२)
## उधळण रंगांची

ही उधळण त्या रंगांची
की रूप त्या ईश्वराचे
रोज दर्शन तो देतो ना
हे खेळ परमेश्वराचे

तो हसतो तेव्हा
शुभ्र रंग विलसतो
तो रमतो तेव्हा
आकाशी रंगी पसरतो

तो कृपा जेव्हा करतो ना
केशरी रंग भरभरतो
तो भरून जाय भक्तीने
ढग भरल्या रंगी उरतो

कधी नितळ होत रंगाने
तो हृदय आपुले सांगे
कधी निरभ्र आकाशातून
तो भाव तयाचे मांडे

कधी घुम्म होतं आभाळ
सारे रंग काळपट होती
तो निराश असतो नक्की
तेव्हा रंग रंगहीन होती

सूर्य उगवतो जातो
दोन्ही वेळा रंग बहरती
तो येतो त्याच्या रूपे
रंगची सोबत करती

त्याला प्रिय सारेच रंग
तो त्यातुन प्रकटत जातो
त्याची रोजंच होते होळी
त्याची रोजंच असते दिवाळी

तो कळेल जेव्हा तेव्हा
सारे रंग रेखुन जातील
ती मूर्त त्याची अनुपम
हृदयात रंगवून जातील

दि.११/०६/२०२०
रात्री ८.३८ वा.



## (३३)
## तो कृपाळू आहे

अदृश्य तो अमूर्त तुमच्या समीप आहे
कृपा तयाची खरोखरी हो अमीप आहे

तो दिसतो ना तरीही आपुल्या कणात आहे
काळ अथांग तो आणिक छोट्या क्षणात आहे

पंचमहाभूतांचे तोच तो स्थान आहे
पंचप्राण जे त्याहून मोठे धाम आहे

संकल्पांच्या आणि विकल्पा तो पार आहे
श्रद्धा जितकी आर्त, कृपाही अपार आहे

सारी माया विरणारी, तो.. अजरामर आहे
अगम्य शक्तीपुढती मानव पामर आहे

शरण जाणे हा मार्ग प्रभावी, तो कृपाळू आहे
गा दुःखाच्या कितीही ताना, प्रभु कनवाळू आहे

दि.१७/०५/२०२२
सकाळी ०९.३१ वा.



## (३४)
## रूप तेजल सेजल

रूप तेजल सेजल
सजीव आजीव
पाहून घ्यावे गौरीचे
मनोरम महालक्ष्मीचे

आई गणेशाची
शक्ती हीच शिवाची
भक्ती विष्णूची मूर्त
मोहिनी रूपाची

तिचा सोज्वळ शृंगार
तेज अपरंपार
नाकात नथ शोभते
गौराई घरी विराजते

ती साडी तो पदर
गळ्यातले हार
अंबाड्यात वेणी माळली
तीच रूपावर बघ भाळली

ते कुंकुम तिचे
सूर्यचंद्राचे
कानी लोलके
चमकायचे

नजर खाली
बघते आई
जणू स्वर्गातून
पृथवीवरी

वात्सल्य रूप
ममता माया
जिव्हाळा तुझे
हेच स्वरूप

माधुर्य मूर्तीत
मी मूर्त होते
रचना तुझी
उत्स्फूर्त होते

मी गढून जाते
तुझ्या सेवेत
आई घे मला
प्रेमे कवेत

दि.१२/०६/२०२०
सायं ०७.०० वा.




## (३५)
## विठाई दर्शनाला

जीव तळमळे माझा
विठाई दर्शनाला
तिचे रूप मोहवीते
वाचा लागे भजनाला

अशी वारी ही घडावी
वारी जन्माची चुकावी
पंढरीच्या देवतेला
भक्तिरसात नहावी

आले संकट संकट
वाट झाली की बिकट
चालताना विठू विठू
नाम ओठी हो प्रकट

एक अशी दिंडी माझी
त्यात पादुका तुझ्याच
ध्वजा वैष्णवी हातात
अभंगाची साथ त्यात

देह गाभारा करावा
त्यात विठू विराजवा
त्याच्या चंदनी टिळ्याने
परिमळ आत यावा

दि.०१/०७/२०२०
सकाळी ०८.३७ वा.




## (३६)
## रूप अंबेचे

रूप अंबेचे गोजिरे
रूप अंबेचे साजिरे
शक्ती साऱ्या जगताची
लीन चरणी व्हावे रे

झाली प्रकट स्वयंभू
दंड देण्या असुराला
कृपा बरसून जाते
भक्त तिचे की होता रे

मूर्तीतून तेज वाहे
नेत्र दोन्ही चंद्रसूर्य
सारी नक्षत्रे ओटीत
ब्रह्माण्डचि पुत्र हो रे

ऐशी माता जगन्माता
अंबाबाई माझी आई
तिच्या कृपेत नहावे
रोज नाम ते घेता रे

अलंकारपूजा उटी
महावस्त्र नेसवीले
तत्त्व जागृता असे हे
भक्त जागे की होता रे

साऱ्या देवांची उत्पत्ती
मूळमाया शक्ती हीच
रूप सुंदरी मोहिनी
भक्त तारण्या प्रकटे रे

नवविधा भक्ती द्यावी
नवरात्रीचे पारणे
हृदयात वसते ना
सिंहासन देता सारे

रूप लोचनी साठवू
क्षणोक्षणी की आठवू
अंबा पदोपदी मनी
जीव लेकरू होता रे

दि.१७/०७/२०२०
सकाळी ०८.०३ वा.



## (३७)
## श्याम राधेत विरावा

काळा सावळा हा श्याम
नभातुन दाटलेला
वाजवीत जलधारा
हाती तोच पावा घ्यावा

मन होत गोपगोपी
त्याचा स्नेह की झेलावा
राधा अंतरात्मा होई
श्याम राधेत विरावा

झरताना आभाळाने
मज चिंब ओलवावे
असा पाऊस येताना
गीत ओठात झुलावे

दि.१७/०७/२०२०
दुपारी०१.३५ वा.



## (३८)
## रामंच वसतो आहे

मनामनातुन जनाजनातून
रामंच वसतो आहे
मंदिर त्याचे पुन्हा घडावे
स्वप्न पाहतो आहे
हिंदू स्वप्न पाहतो आहे

शतकं पाच ही उलटून गेली
दुष्ट प्रशासक यवनी
मंदिर पाडून मस्जिद केली
हिंसक क्रूर कहाणी

रुसला लल्ला हसला मुल्ला
धर्म प्रसार हा खोटा
शतकांचा अन्याय झेलला
हिंदूमनी राम होता

चेतविले स्फुल्लिंग उरातून
बाबरी ढाचा तोडीयला
जीव कितीक हे गेले यास्तव
रक्त सडा आणि सांडियला

शतके शतके हिंदू जगला
रामनाम हे जीवन गा
न्यायासाठी हिंदू तरसला
रामच उत्खननात अहा

राम जागला न्यायप्रकरणी
न्यायामध्ये राम आला
श्रीरामाच्या धामासाठी
नरेंद्र योगी धडपडला

श्रीरामाचे मंदिर भव्य
उभारणीची शुभपूजा
चित्त शुभंकर हिंदुराजा
श्रीराम राम गाजावाजा



श्रीराम असे हे दैवत आमुचे
वारसा सारा संस्कृतीचा
मर्यादापुरुषोत्तम राघव
पुतळा सुंदर निजकृतीचा

मंत्र तारतो जय श्रीराम
जानकीपती जय जय हे राम
हनुमतस्वामी, पुत्र महान
आदर्शाचे भव्य निधान

स्वप्नपूर्तीचा दिन सोन्याचा
दीप उजळू या आशेचे
रामनाम जप रोमरोमी ह्या
मंदिर आमुच्या अस्मितेचे

श्रीराम राम जय राम राम
ह्या श्वासावरती एकच नाम
भव्य मंदिरासवे होऊ दे
रामचरणी रमणीय प्रणाम !

देखणे मंदिर अभिरामाचे
कोरीव शिल्पस्तूप उभे
भूमीपूजन करुनी सत्वरी
रचण्या मंदिर भव्य नवे

वनवास संपला दीर्घ येथला
जे रामाचे त्यास मिळो
निजमंदिरी श्रीरामा पाहून
जन्मोजन्मीचे पुण्य फळो

दि.०५/०८/२०२०
रामप्रहरी ०४.५१ वा.



(३९)
**कृष्ण मधुर गीत हे**

कृष्ण कोण चित्त माझे
कृष्ण अंतरंग
कृष्ण कोण ध्येय माझे
जीवन तरंग

अवतरला बाळरूपे
मोहक ते रूप रे
पूर्णपुरुष अवतारी
धर्म हे स्वरूप रे
कृष्ण कोण गीता
उपदेश सार सारे हे
कृष्ण कोण सारथ्य
देहरथ रथी रे

दुष्टनिर्दालनी
लीला साऱ्या खेळल्या
प्रेम अलौकिक कसे
रासकेली गोपिका
कृष्ण कोण राधिका
कृष्ण रुख्मिनीवरा
कृष्ण होतो प्रियसखा
कृष्ण मीरा भक्तीचा

कृष्ण सत्य कृष्ण नित्य
कृष्ण परमधाम गे
कृष्ण ध्यान, कृष्ण ज्ञान
कृष्ण मोक्षनाम हे
कृष्ण कोण तनमन मम
कृष्ण प्रेमरंग हे
कृष्ण श्वासबासुरी
कृष्ण मधुर गीत हे

दि.११/०८/२०२०
सकाळी०७.२२ वा.




## (४०)
## गाठू म्हायेर पंढरी

पांडुरंग भेटीचा ह्यो किती वियोग साहिला
आज विठुराजा म्या बी डोळा भरून पहिला
माय माझी रखुमाई वाट बघून थकली
पोरं येतील कवा ती काळजीनं की सुकली
चंद्रभागा उतावीळ खळखळून दमली
न्हाऊमाखू घालण्याला सपनात हो गमली
बुक्का अबीर बोलला हात कुठं गेलं सारं
आम्हा उचलून टिळा लावतील कधी का रं
माळ तुळशीची पार झुर झुरून झिजली
पंढरीची वाट येडी भक्ताविण की थिजली
ऐकू येई ना गजर, माऊलीचा तो जागर
दर्शनाच्या तहानंनं याकुळ वारकरी सागर
आता सरलं मळभ आली आषाढीची वारी
पावलांना ध्यास उरी, गाठू म्हायेर पंढरी

दि.२४/०६/२०२२
सकाळी ०८.११ वा.



## (४१)
## शंभो करतो तुज अभिषेक

डोळ्यामधल्या स्वच्छ जलाचा
शंभो करतो तुज अभिषेक
सेवन करतो त्या तीर्थाचे
आराध्य रे तू मजसी एक

तुझ्या शिवाय न काही मनी या
तूच जीवनातील मज ज्योत
प्रकाश अंतःकरणी पसरे
तेजतत्त्व तू ओतप्रोत

जीव रंगतो रंगांमध्ये
रंग खरा हा तुझाच की
बाकी उडती फिकेही पडती
अभंग रंग हा तुझाच की

तूच दिलेले तुला समर्पित
चित्त, मन आणि आत्मकरण
जीव पुष्प हे शुभ्र वाहतो
त्रिगुणी त्रिदली बिल्व सत्तम

प्रवास आमुचा तुझ्याच हाती
कुणा कर्माची कशी फळे
सत्कर्माने शिव भेटवला
अन्य काही मज न च आकळे

नको दुरावा तव चरणांचा
तूच सद्गुरू जगताचा
सामावून तू घेशी विश्वा
उरशी पुन्हा मग दशांगुळाचा

तुला बाहेरी कसे शोधू मी
आत्मलिंग मज आत असे
स्फुल्लिंगाची मंगलज्योती
आत्मदेव्हारी तेवतसे

दि.१०/१२/२०२०
सकाळी ०९.०३ वा.



## (४२)
## अगे शारदा

गाली हासली अगे शारदा
चांदणे शारदी गेले पसरून
हसल्या साऱ्या विद्या स्मिता
कलाही सगळ्या गेल्या पखरून

झंकारली ही वीणा सारे
हास्यसूऽऽर निनादुन गेले
तिच्या करांगुलीमधुनी पाझरे
अमृत जणू की स्वर्ग धुमारे

कमलावरती बैठक ऐशी
योगसाधना निरंतराची
चरण एक सोडिलासी खाली
ज्ञानगंगा वाहती झाली

हंस उभा तुज नेण्या उडवून
तुझ्या कृपेचा बोधची सोऽहम्
ईशतत्त्व हे शुद्ध ज्ञानमय
कैवल्याचे करीशी दानम्

जिव्हाग्री तू होई विराजित
सदैव रहावे मुखी सुशोभित
वाग्देवी तू सृष्टीवाणी
तूच अंतरी दृष्टीवाणी

लाभ तुझा या जन्मी होता
सुफळ सारे यत्नही होती
लयास पीडा जाती साऱ्या
शब्दमौक्तिके कंठी होती

परमानंदासाठी गी:
तूच सत्यशिवसुंदर वाणी
ब्राह्मी वाचा वीणावादिनी
विद्यादेवी भाषा विधात्री

तूच शारदा हंसवाहिनी
तूच मधुरा भक्ती आणि
शब्द अर्थ तू परमार्था तू
तूच होई गे मंजुभारती

दि.१५/१२/२०२०
सकाळी १०.१४ वा.



## (४३)
## राधेचा होत कान्हा

रे कृष्ण दामोदर
ये ना तू अवनीवर
राधा म्हणून मजला
घे तूझ्या बासरीवर

ते प्रेम देहातीत
ते मीलन अतीत
कोणी न मजसी दुजा
जन्मोजन्मी प्रतीत

कोणा न कळे सहजी
ती आपुली रे प्रीत
कोणास वाटे देह
होतात दोन एक

कोणी करे विचार
मन दोन जुळले आपुले
पण याही पलीकडचे
ते प्रेम दिव्य आपुले

आतून भेट होते
ते आत्म मीलन की
देहास इथे सीमा
मी कृष्णमय वेडी

तूही उगाऽऽऽच माझा
लेऊन रंग राधा
तो कृष्ण नाकळे ना
कोणास का रे साधा

माझ्या कणाकणावर
तू प्रेम पेरलेले
माझ्या क्षणाक्षणावर
मोहन कोरलेले

मज आजही दिसावा
ब्राह्मांडी तूच राजस
आले पुन्हा मी येथे
ते तेज मिळविण्यास

पाहून वाट शिणले
साथी न साथ देई
तू माझ्या प्रेमासाठी
येई ना झणी येई

तेव्हाही राधा होती
लौकिक विवाहित
होती परंतु केवळ
ती तुजवरीच मोहित

तो सोहळा विवाही
अद्यापि चालतो रे
तुलसीविवाहसमयी
आपुला विवाह हो रे

मी तळमळे रे श्याम
ये ना जवळ घे ना
ते कुंजवनी होते
तैसेंच प्रेम दे ना

ना अर्थ तूजवीण
नात्यास येथल्या या
मी अर्पिले स्वतःला
माझ्याच सावळ्याला

पाहू नकोस अंत
मुरलीधरा अनंता
राधा अधुरी आहे
तुजवीण भगवंता

अश्रूंची वाहे सरिता
श्वासास तूच आस
नाही रे मनी काही
केवळ तुझाच ध्यास

देहात प्रकटुनी ये
देहातुनी दे मुक्ती
घेऊन तूजजवळी
राधेची चाख भक्ती

ही प्रीत काही भिन्न
हे तत्त्व  वेगळेच
मी तू रे राधेश्याम
अनुराग आगळेच

मी युक्त तुजसवेच
युगयूगे उलटावी
राधेस भेटण्याची
ही कृष्ण ओढ व्हावी

देऊ नकोस जन्म
राधेस नवा पुन्हा
तू येणे मग अटळ रे
राधेचा होत कान्हा

दि.१०/०२/२१
सकाळी १०.१५ वा.



## (४४)
## बालरूप हे सत्य शिवाचे

बालरूप हे सत्य शिवाचे
हास्य मुखी विलसते
पिंडीमधुनी पिंडामधुनी
तत्त्व तेच की वसते

सदासदोदित रूप अनोखे
दिसते सुंदर शंकर
कसले तांडव कसला प्रलय
हे रूप अतीव शुभंकर

चर्म तनुवरी भस्म कपाळी
माळा रुद्राक्षांच्या
चंद्र कलापी कर्णी कुंडले
दृष्टी तीन अक्षांच्या

सदा पाहतसे सदाशिव हा
रुपडे नारायणाचे
कधी राम हा कधी कृष्णही
बाल्य सुखी भोगण्याचे

जो भोगातून करितो मुक्त
जो योगाचा दाता
बालपणाचा मोह नावरे
मोहक रूप ते घेता

काय मागावे परमानंदा
कंद सच्चिदानंदा
भाग्य फळावे बाल्य मिळावे
रूप पुन्हा एकदा

दि.१५/१२/२०२०
दुपारी ०३.०१ वा.



## (४५)
## कृष्ण राधा एक ती

हे प्रेम आहे रे कसे
देहास नाही शुद्ध ती
शुद्धीमती आत्मिक जगती
कृष्ण राधा एक ती

लौकिकाने वाटते ते
शरीर दोन्ही भेटती
आत आतून चालली
आत्म्याची गूजे थेट ती

ही मृदुता माधुरी
राधा कशी अतिकोमला
कृष्ण वेडा सावळा हा
रंगी त्या नित रंगला

एक होई प्रकृती स्त्री
पुरुष आत्मा रूप हो
सृष्टी सारी निर्मिण्याला
तत्त्व ऐसे एक हो

एक धारा वाहणारी
जगरहाटी वेगळी
कृष्णलीला प्रेम त्याचे
सखीच राधा आगळी

तिजसवे रममाण मोहन
मोहिनी ती दिव्यसी
मीलनाच्या सोहळ्याला
आत्मप्रीती भव्यसी

ज्या कुणा कळली ही राधा
मोहनाची गोजिरी
आम्रतरुला लगडली जणु
सुरभी मंजु मंजिरी

दि.२१/०१/२१
सकाळी ११.११ वा.



## (४६)
## वर दे शारदे

रूप शुभंकर वाग्देवी तव
विद्या ज्ञान प्रदायिनी
कला नृत्य संगीत शारदे
वसंत पंचमी तिथी जननी

माघ शुद्ध पंचमीस प्रकटे
ही शब्दांची ईश्वरी
त्रिभुवन मुखरित गीत गायन
कलामयी भुवनेश्वरी

उत्पत्ती हिची जगकल्याणी
नाद उमटले हिच्यासवे
शब्दहीन अधुऱ्या विश्वाला
शब्द लाभले हिच्यासवे

शब्दराज सेवक देवीचे
रस ज्ञान विद्या वाणी
संगीताची स्रोत ठरतसे
साहित्याची गुणगाणी

कला जन्मल्या हिच्या कलांनी
वीणेचा झंकार झणी
वेदग्रंथही हिच्याविना ना
प्रकटु शकते काही मनी

हीच प्रतिभा कविराजांची
विद्वानांची विद्वत्ता
बुद्धीवरती सदैव चाले
गणेशासवे हिची सत्ता

सत्त्वगुणाचे रूप घेऊनी
भक्ती बुद्धी ज्ञान वसे
स्फटीक माळ ही सांगत जाते
ज्ञानासाठी भक्ती असे

वीणावादन दिव्य स्वरांनी
अशी शांतता लाभतसे
मुखी प्रसन्न आभा पसरे
मंद हास्यही विलसतसे

ब्रह्मदेवाच्या सृष्टीमधली
दूर केली तू अपूर्णता
नदी वाऱ्याला अन सृष्टीला
मानवा दिधली तू पूर्णता

वाणी नसता शब्दहीन हे
सारे अवकळले होते
आनंदाचे शब्द पखरले
तुझ्या निर्मितीने होते

नामरूप तव भिन्न भारती
शतरूपा तू वीणावादिनी
वागेश्वरी वाग्देवी शुक्ला
वेदवती तू मंजुभाषिणी

मेधासुक्तातून कीर्ती ही
वेदांमध्ये गायली गे
उपनिषदांच्या पुराणांच्याही
पानांवर तू राहिली गे

पशूस मानव करण्यासाठी
तुझी कास ही धरणे माते
वाणी ज्ञानाविना न किंमत
अमूल्य जीवन तुझ्यासवे

ऋतुराजाच्या वसंत स्वागती
तुझी पूजा ही घडते ना
सौंदर्याच्या आधाराला
ज्ञानचांदणे पडते ना

संगीताने वसंत भुलतो
ज्ञानकलासाहित्यही फळू दे
म्हणून शारदे वरदे ज्ञानदे
मज दान हे सारे मिळू दे

नमन अखंडित करते तुजला
आराधना तव सफल होऊ दे
संगीतकला अन साहित्याच्या
कृपावर्षावी चिंब होऊ दे
वर दे शारदे, वर दे शारदे

दि.१६/०२/२१
सकाळी ९.३३ वा.




## (४७)
## शिव लाभतो कुणाला

शोधीत होते स्वास्थ्य
लाभेल का मनाला
माहीत नव्हते यातून
शिव लाभतो कुणाला

तो लाभला भला जो
शिव सत्य सुंदराहे
अन सुंदराची चरिते
मन माझे मंदिराहे

दाबून दुःख होते
मी ठेवले कधीचे
माणूस शोषणारा
शिव पोसणारा आहे

ते आवरण चुकीचे
माया तिचे ते जाळे
मोहात अडकुनी मी
जन्मास व्यर्थ केले

हा अर्थ लाभला मज
शिव काळजात आला
एका क्षणात जटिल
पडदा सरून गेला

ही लाभे शांती मजला
आता स्मशानी देखील
शिव नांदता मनात
शल्य कसे बोचतील

नमने नि जपता त्याला
श्वासागणिक नाम
सारे समर्पिले मी
तो एक नित्यधाम

आता मिळावी कितीही
फकिरास सारी दुःखे
झोळीत विरक्तीच्या
येवोत किंवा सुखे

दोन्हींच्या पलीकडले
जगणे करून घ्यावे
केवळ शिवास हृदयी
कवटाळुनी ते घ्यावे

डबडबले नेत्र दोन्ही
पुसणार नाही कोणी
आतून शिव माझा
आता नकोच कोणी

या बांधनातुनी हे
अलगदसे सोडवावे
मुक्तीचे दान शंभो
बस तूच तेही द्यावे

छळले जीवास ज्याने
ने दूर दूर त्याला
केवळ वसू दे आता
आत्म्यात शंकराला

शिव जीव एक व्हावा
ना भेदाभेद राही
सोऽहम् शिवोऽहमस्मि
ना जाणणेही काही

दि.२५/०२/२१
रात्री ११.२१ वा.



## (४८)
## नभ रंग तू

श्याम तुला शोधू कुठे
नभ रंग तू
पाहू कसे कुठे सांग
अंतरंग तू

हो प्रकाश निळा निळा
निळी सखोली
निळ्या अशा सावळ्या
हरीची बाधा झाली

घरी तोच दारी तोच
अंगणीही तोच
दूर कुठे जावे तरी
मनी वनी तोच

दिसे उघड्या दृष्टीला
म्हणून मिटून घेते
लोचनांच्या आतूनही
रूप तेच दिसते

व्यापला कणाकणात
काय जादू केली
रासरंगी गोपिकांची
एकात्म मने झाली

आजंही दिसे तो मला
पानापानातून
झाडीतल्या वाकलेल्या
कवडशातून

एक कवडसा आत
आलेला असे हा
बाहेर ना शोधू आता
आतची वसे हा

दि.०४/०३/२१
०८.३१ वा.



## (४९)
## तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

तुझ्या सांडण्याला नको भेदभाव
ते पावित्र्य हृदयी, तुझे नित्य नाव

कुणा पदरी देतोस धनधान्य कोटी
कुणाला फिरविशी मुखी घासासाठी
पूस एकदा पाप नामक गाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाला सुखाचे पदी गालिचे अन्
कुणाला का देतोस जळते निखारे
कुणी शांतचित्ती, कुणा केवढी हाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

जे कर्म घडते नकळता असे ते
कसले हिशोबन् कसल्या पखाली
कर माफ तू एकदा सारे डाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाला फुले रेशमाची मिळावी
कुणाला उगा काटे रे बोचताती
भर एकदा तू कृपे सारे घाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाचे मरणही किती गौरवाचे
कुणाचे जिणे ते किती व्यर्थ जाते
तू मोक्षधामी ने साऱ्यांची नाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

देतोस गठडी अशी संचिताची
न आठवते काही, तुला जाण त्याची
ग्रहांना दे साऱ्या सुयोगाचे वाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

दे एकदा सारे सोडून तूऽऽही
किती काळज्या वाहतो देवा तूही
जीवाला शिवाचा लळा घट्ट लाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव
ते पावित्र्य हृदयी तुझे नित्य नाव

दि.१५/०७/२०२२
सायं ०७.१३ वा.



## (५०)
## अर्ध नारी–नटेश्वर

शिवशिवानी भवभवानी
ती हर अर्धांगिनी
आदिमाया आदिशक्ती
सती पार्वती मानिनी

एकरूप ते दोघे जगती
पुरुष आणि प्रकृती
संसाराचे चित्र रेखण्या
अजोड दंपत्ती

तिला पाहता शिव भासतो
त्याच्यामध्ये ती
दोघांचे अणुरेणू एकंच
एक भाग्यपंक्ती

नेत्र शिवाचा तिसरा भाळी
कुंकुम तेच तिचे
डोळ्यांमधले दृष्टीभावंही
सृष्टीस्तव त्यांचे

हास्य उमलते मुखकमलावर
इंदीवर अक्षी
राजीवलोचन ती मृगनयना
युगल प्रीत साक्षी

जगज्जननी ती, तो परमेश्वर
दैवत विश्वाचे
रूप अर्ध नारी–नटेश्वर
व्रत विश्वासाचे

दि.१८/०३/२१
दुपारी १२.२५ वा.



## (५१)
## हाक माझी ऐक ना

या संसारी, चिंता भारी
संकटांच्या मी फसले भवरी
धाव पाव रे श्याम मुरारी
तारणकर्ता तूच ना
हाक माझी ऐक ना
हाक माझी ऐक ना ।।धृ.।।

तूच माझा  देव, सखाही
मित्र जिवाचा, मात पिताही
तू अनंत अन तूच अनादी
अंतरात तू तूच ना
हाक माझी ऐक ना
हाक माझी ऐक ना ।।१।।

कर्म घडावे उत्तम हातून
कर्मफळाची आशा नाही
लोभ नसू दे आकांक्षांचा
एक मनीषा तूच ना
हाक माझी ऐक ना
हाक माझी ऐक ना ।।२।।

कधी वाटते इतुकी दुःखे
मजभाळी का लिहिली असतील
असूनही सारे नसती कोणी
एक तूच आधार ना
हाक माझी ऐक ना
हाक माझी ऐक ना ।।३।।

एक सुखाची लहर वाटते
पुन्हा खंडीभर दुःख भेटते
जीव तुझ्या भेटीला आतुर
अश्रूंना गूज सांगू दे ना
हाक माझी ऐक ना
हाक माझी ऐक ना ।।४।।

एक लागू दे छंद तुझा मज
मीच राधिका मीरा गोपिका
तव वेणूवर मीच स्वराली
मज हृदयी तू वसशी ना
हाक माझी ऐक ना
हाक माझी ऐक ना ।।५।।

दि.२५/०३/२१
दुपारी १२.२१ वा.



## (५२)
## आर्त व्याकुळ हाक माझी

आर्त व्याकुळ हाक माझी
तुज हृदयी पोचेल ना
भाव मनीचे, शब्द नसता
सारे सांगून जातील ना

का कशी कोणास ठाऊक
आर्तता निपजे मनी
दुःख वेडे वाहते ना
आर्ततेच्या जड पखाली

आर्तता जन्मास येते
आतल्या दुखऱ्या खुणा
हाक ऐशी फुटते आतून
सांगणे जे व्यर्थ कोणा

माय ना दिसताच डोळा
वासरू भटके जरा
संकटाची चाहूल
आर्त हंबरडा खरा

दिसतो मृत्यू क्षणीच एका
वाटते संपलेच सारे
वाचविण्या जीवास आतून
आर्तता ऐसी पुकारे

घेरती कोल्हे लबाड न
संकटांचे टोळ ही
धाड येते धाडकन अन
नाती सारी फोल ही

मिटता डोळे तू दिसे
मग आर्तता तुजसाठी ही
तूच तारणहार हा
विश्वास वसतो कीं मनी

दूर करण्या आर्तता
कोणी समर्थ नसतो दुजा
विश्व सारे कः पदार्थ
तुजविना जो तो खुजा

आर्त ही किंकाळी माझी
मूक असते कैकदा
ऐक रे तू नाथ माझा
ऐक मजसी एकदा

दि.२९/०३/२१
सायं ०७.१३ वा.



## (५३)
## रंग कोणता

रंग कोणता असा माखला
रंग राधेचा कृष्ण जाहला
अंतरंगाची रंगपंचमी
युगयुगे हा खेळ चालला

ती गुलाबी, तो निळाई
तीच लाली, तो हिरवाई
सोनपिवळी ती, तो नारंगी
ती सुरंगी, तो श्रीरंगी

रंग ऐसा टाकला तो
उंच आकाशी झुले
त्याच्या रंगी रंगलेली
राधा हरीरुपी डुले

रोज चाले कुंजवनी ती
आत्मरंगी पंचमी
धूळ उडते ऐहिकाची
अर्थ येई जीवनी

घे मला सांभाळ हरी रे
मोहना मी मोहिनी
तूही मोहित रंगगंधित
पौर्णिमामय यामिनी

एक हा चढू दे ना रंग
नाम रंगी रंगणे
जन्मोजन्मी रंगाधीशा
आत्मरूपी दंगणे

दि.२९/०३/२१
रात्री ०८.२३ वा.



## (५४)
## भाव तिथं देव

भाव तिथं देव । तीच खरी ठेव ।।
शुद्ध भक्ती मनी । अखंडित ।।१।।

श्रद्धा ती सात्विक । पूजा मानसिक ।।
पावित्र्य भाविक । राहो नित्य ।।२।।

चराचरी तोच । मृत्तिकी पाषाणी।।
पंचमहाभूती । तोच राहे ।।३।।

जीव शिव एकी । देव हा प्रत्येकी ।।
भाव नको बेकी । दुजा काही ।।४।।

शंका ना कुशंका । अहंभाव डंका ।।
राजा असो रंका । समभावी ।।५।।

एकमेव तत्त्व । आदी नि अनंत ।।
तोचि गे दिगंत । भरलेला ।।६।।

ठेवी रे विश्वास । दृढ एक आस ।।
आत हा कयास । फळेल की ।।७।।

ठेव तू अमूल्य । भाव अनमोल ।।
भाव तिथं देव । प्रकटेल ।।८।।

दि.३१/०३/२१
सकाळी १०.१५ वा.




## (५५)
## राधा मिळाली कृष्णसागरा

रूप राधेचं नाजूक कवळं
मोहनाचं गं रूपडं सावळं
गंध हुंगतो गुंगतो श्याम
राधा केसात गुंततो श्याम

राधा हरखली, राधा हरपली
चित्त हरवून गेली वेडी
मन रमेना काही सुचेना
तिला कृष्णाची केवळ गोडी

हाती कमळ घेऊन बसली
मनी हळूच खुदकन हसली
हात टेकविला गोऱ्या गाली
एक पसरली मुखी लाली

डोळे मिटले तरी हा दिसे श्रीहरी
त्याचेच चिंतन साऱ्या प्रहरी
अवती भोवती त्याचाच वास
आत बाहेरी त्याचाच भास

मोकळ्या केसात श्याम राहतो
चांदण्यातून तो मला पाहतो
आभूषणे सारी फिकी त्यापुढे
श्यामच माझा भूषण खरे

तो माझा मी त्याची युगानुयुगे
प्रीतसरिता वेगळी वाहे
रीत वेगळी वेगरी धारा
राधा मिळाली कृष्णसागरा

दि.०३/०४/२१
रात्री १०.१४ वा.




**(५६)**

**राधा कृष्ण चरणाशी**

हरी पदकमलासी
राधेच्या पदा
राधाकृष्णचरणांशी
सर्व संपदा

रासक्रीडेमध्ये गिरकी
घेतली त्यांनी
एकरूप दोघे
मन आत्मभावानी

मने चालती सोबत
सोबत पदे
रंग सावळा नि गोरा
पदानुपदे

म्हणे कृष्ण सांग राधे
किती तू गोरी
सर्वांगी मी सावळा गं
काळाच हरी

नको अशी खंत करू
मनी काहीतरी धरू
जोडू पदालागी पदं
मग निर्णयासी करू

क्रीडेमध्ये जोडीयले
एकएका पदा
झणी अशा दर्शनाने
विलयी विपदा

गाली हसे कृष्णराया
झालो कसा गोरा
राधेलाही तिचा पाय
दिसे की सावळा

तुम्हा आम्हा दिसे
असे रूप हे वेगळे
द्वैत मनी असे त्यांना
चरण आगळे

जिथे झाली आत्म
परमात्म संगतीच
राधाकृष्ण चरणाशी
नित्य सद्गतीच

दि.०५/०४/२१
सायं ०६.५८ वा.




## (५७)
## बालरूप श्रीराम मोहवी

बालरूप श्रीराम मोहवी
कौशल्येचा बाळ
वाढतो दुष्टजनांचा काळ
करील तो सज्जनांचा प्रतिपाळ

रूप सावळे गोजिरवाणे
केस कुरुळे नयन तवाणे
कानी कुंडल कडे हाती अन्
अलंकारित गळा शोभणे

नाद निनादे नूपुर पायी
दुडूदुडू धावतो राम त्रिकाळी
इवले घेऊन धनुष्य हाती
बाणांचे वर्षावही होती

हास्य गोड स्मित फुलते मुखी त्या
श्रीरामाच्या अगम्य लीला
बाळ राम तरी देई दिलासा
रघुकुल साऱ्या ऋषींची आशा

एक शांत सालस रूप ते
रामचंद्र श्रीविष्णू अंश हे
रावणवध राक्षस निर्दालन
करण्या अवतरले भूवरी जे

रामनाम तारक ही मात्रा
रामनाम अभिराम ही गात्रा
संकट तारक दुर्जन मारक
जपा चला रामनाम ह्या मंत्रा

राममोहिनी मनास पडू दे
असे अभिवादन चरणी घडू दे
राम राम रोमरोमी जडू दे
रामची धन हे माझे वाढू दे

दि.२१/०४/२१
रात्री ०७.५१ वा.




## (५८)
## मेंदी बाहेरी अंतरी

राधेकृष्ण रेखिले मी
मेंदी काढून गं हाती
मिळो कृष्ण हाच साथी
राधे जन्मोजन्मासाठी

एक बासरी असावी
सूर सोबतीस त्याचे
मोरपीस मनी फिरो
मलमली स्पर्श ज्याचे

प्रीत आगळी वेगळी
जगरहाटी निराळी
कृष्ण रंगात रंगून
राधा मेंदीत सावळी

रंग चढेल चढेल
मेंदी उमटेल हाती
किती आठवणी त्याच्या
गोंदलेल्या गं राहती

मेंदी अबोल लाजरी
आज बोलली बिचारी
राधाकृष्णाची नावं ही
मला शहारून गेली

म्हणे धन्य झाले मीच
प्रभू प्रीत अवतरी
आता रंगून जाईल
मेंदी बाहेरी अंतरी

दि.२२/०४/२१
दुपारी १२.०९ वा.



## (५९)
## मीच राधिका प्रेमा तृष्णा

तुज मानीयले सर्वस्वच मी
अरे मोहना खट्याळ कृष्णा
मी मीरा रे भक्तिसमर्पित
मीच राधिका प्रेमा तृष्णा ।।धृ.।।

खेळ चालले तुझे नि माझे
लपंडाव करशील किती
आज पकडले तुला सावळ्या
डोळ्यांवरती झाकून मी
चुटकीसरशी सोडव प्रश्ना
मीच राधिका प्रेमा तृष्णा ।।१।।

मूर्त तुझी वाटते बाहेरी
तूच माझ्या अंतरी श्रीहरी
जितुके केले प्रेम तुझ्यावर
अधिकची प्रीती तुझी बावरी
मज हास्यातून ओठी बैसना
मीच राधिका प्रेमा तृष्णा ।।२।।

झाकून माझे डोळे हसशी
लाडिक अवखळ तुझ्या कृती
माझे समर्पण तुलाच अर्पण
माझे मीपण होय विस्मृती
तू आत्मा मी आत्मलीनता
मीच राधिका प्रेमा तृष्णा ।।३।।

असा भेटला हरी मला मग
कसा सांगू आनंद उरी
जीवन झाला जीवनदाता
गाथा आमुच्या प्रेमाची खरी
एक पूर्तता भाव पावना
मीच राधिका प्रेमा तृष्णा ।।४।।

दि.२८/०४/२१
सकाळी ११.२३ वा.



## (६०)
## प्रेम कृष्ण नाव

गरज नसते प्रेम कधीही
प्रेम सुखदुःख साथ
भावनांच्या जाणीवा अन्
जाण रेशीम एक आत

ते शरीरी नसते राहत
राहते हृदयांतरी
त्याही पलीकडले कधी मग
राधा आणिक श्रीहरी

रंग याचा गडद गहिरा
चढतो कधी ना उतरण्या
शिल्पे याची घडती येथे
शब्द नाहीत वर्णिण्या

चित्र प्रेमळ उमटते
पट चित्त चित्ताकर्षक
कुंचलाही प्रेमभरे मग
होई मोरपीस हर्षद

प्रेमपावा वाजतो की
सूर स्वर्गीय लहरती
कामनांचे खग उतावीळ
भावनांनी विहरती

हे असे प्रीतदिव्य मोठे
दिव्य त्याची कांती ही
भव्य करते मज मनाला
लाभते सुखशांती ही

प्रेम ऐल प्रेम पैल
प्रेम आत्मभाव
प्रेम शुद्ध सोवळं
प्रेम कृष्ण नाव

दि.०८/०५/२१
रात्री ११.३८ वा.



## (६१)
## लीन प्रभुपदी नित हनुमान

अभिवादन श्रीरामप्रभु मज
हनुमंताला आशीष द्यावे
भक्ती मन्मनी नित्य वसावी
अजरामर मी त्यास्तव व्हावे

प्रभूपदासी धाम हे माझे
पावन तीर्थही स्वामी राम
दर्शन तुमचे चिंतन तुमचे
दास सदोदित सेवा काम

तुम्ही लाभले काय हवे मज
तनमन माझे पायी पाहिले
जे जे करीन मी प्रभुसेवेला
तेच सारे या हनुमंताचे

बुद्धी शक्ती कृपा ही तुमची
भक्ती युक्ती मुक्ती द्यावी
या हृदयातून छबी प्रभूची
नित्य चिरंतन उमटंत जावी

राम राम प्रभु राम नाम हे
तारक ऐसे आत्माराम
श्वास ध्यास मज हृदयी वास हा
लीन प्रभुपदी नित हनुमान

दि.१२/०५/२१
रात्री ०९.२१ वा.



## (६२)
## प्रेमाचे असे धाम

ही पाहताच मंजिरी साजिरी
राधा दिसते मला
कृष्ण सावळ्यावरची प्रीती
पावन करते तिला

देहातील जे प्रेम तिच्या ते
देहापलीकडले
मनाच्याही बघ सीमा पारून
आत्मरूप झाले

आत्मा जो हा तोच प्रियवर
राधा राणीचा
श्रीकृष्णाच्या प्रीतभेटीने
जन्म सफल तीचा

ते स्वर्गीय प्रेम अवतरे
भूतली राधाश्याम
कधी न जाहले पुन्हा न होईल
प्रेमाचे असे धाम

त्या प्रेमाची पवित्र साक्षी
राधा तुळस झाली
दामोदर हा कृष्ण सावळा
लग्न घटी आली

या दोघांचा विवाह लौकिक
आजही होतो छान
मग मानवी हे लग्न सोहळे
तुलसी विवाहा मान

राधा फुलते कृष्णा भेटण्या
मंजिरी रुपात
देवघरातील कृष्ण हासतो
मंजिरी प्रिय त्यास

असे अलौकिक मीलन आजंही
घरोघरी होते
दारासमोरील राधाराणी
देवघरी येते

दि.१९/०५/२१
रात्री १०.०० वा.



## (६३)
## कणकण तुझाच आहे

मज लाभो कृष्ण माझा
तृष्णा ही एकमेव
नाही उरात काही
स्वर बासरीच ठेव

श्वासावरी तो श्याम
हृदयात कृष्ण नाम
चित्तास मोही मोहन
ते इष्ट मजला धाम

डोळ्यात रूप त्याचे
पाव्यात सूर साजे
गंधात गंध त्याचा
महिमा त्रिखंडी गाजे

सारेच रिक्त आहे
त्याच्याविना हे पाहे
तो लाभताच लाभे
पूर्णत्व सारे सारे

नयनात वाच गाथा
तूझीच रे अनंता
कणकण तुझाच आहे
राधाही भगवंता

दि.२३/०५/२१
सकाळी ०८.३७ वा.



## (६४)

## असे पहावे आत्मरुप मग

शुभ्र पांढऱ्या दलकोशातून
परागकेसर हसती
शुद्ध मनाच्या ठायी जैसे
आत्मबीज उमलती

वीतराग हे चित्त शुभंकर
मंद्रही सारे रिपुदल
हळूच उमलून येते त्यातून
आत्मभान शिवसुंदर

अशी असावी शुभ्र समाधी
आत लीनता यावी
संसाराचे रंग विरावे
एक रंग हा योगी

ढवळ्या अंतःकरणी प्रकाशित
तेज तत्त्व हे व्हावे
आतून एकल सूत्र वळावे
सारे एकचि व्हावे

असे पहावे आत्मरुप मग
तंद्री गळून जावी
चौऱ्यांशीचे चुकवीत फेरे
धन्यधन्यता यावी

दि.१३/०७/२०२०
सकाळी ०७.३१ वा.



## (६५)
## जीव रंगीला संसाराचा

जीव रंगीला संसाराचा
लालचुटुक मोहिनी
शिव तत्त्वाचे धवल सांगणे
मनपाखरू हे अज्ञानी

त्यास वाटते सुंदर सारे
जे दिसते डोळ्यांना
आत नजर ना वळते त्याची
खरे रंग पाहण्या

माया भरल्या जगतामध्ये
उगाच गुंतून जाणे
कळेल जेव्हा खरेखुरे हे
अंतिम सत्य पुराणे

जरी खुणावे लालगुलाबी
नश्वरसृष्टी गाणे
जवळी फुलले एक पवित्र
आत्मज्ञान चांदणे

बसुनी एकदा पाहावे या फुला
पहाट नक्की होईल
कैवल्याचे धवलपुष्प हे
मुक्तानंदी नेईल

दि.१३/०७/२०२०
सकाळी ०८.३१ वा.



## (६६)
## अनंताची आळवणी

रंग ढवळा दुधाचा
पाकळीत उतरला
शांतरस अंतरंगी
गणेशाचा पसरला

रक्त जपा त्यास प्रिय
आज वेगळे उमले
शुभ्र विरक्तीची दले
भोग लौकिक सगळे

फिके गुलाबी हे रंग
मनामनाचे तरंग
गर्भातून दोघांच्याही
केसराचे ते पुमंग

सृष्टी भोगाची योगाची
आत उत्पत्तीचे कण
रंग असू दे कोणता
सगुण की तो निर्गुण

ओंकाराच्या रुपासाठी
रंगपुष्प मिसळणी
गणराया तू अनादी
अनंताची आळवणी

दि.०२/०९/२०२०
सकाळी ०८.५१ वा.



## (६७)
## चित्रकार हा प्रवीण

वारा घोंगावतो आहे
नभ घुसळून जाय
सागराची ही निळाई
गगनात पात्र होय

शुभ्र तक्रासम मऊ
रंग वर फेसाळतो
गोळा नवनीताचा हा
जणू सोनेरी फळतो

सूर्यनारायण आला
आला तेजाळ मधाळ
रस रूप गंध त्याचा
पांघरते ही सकाळ

त्याचे बिंब वर वर
जसजसे सरकते
नवनवीन विचार
जगण्यास सांगताते

रोज रोजचे मंथन
दोर मायेच्या की हाती
रंग रोजचे नवीन
चित्रकार हा प्रवीण

दि.२४/११/२०२०
सकाळी ०८.२१ वा.



(६८)

**मन कमळ**

मन कमळ फुलून यावं असं
चित्त सरोवरही नितळसं
शुभ्र स्वच्छ जलाची सुंदरता
शुभ्रदल पंकजे उमलता

नानाविध भावनांची कल्लोळता
शांत कराव्या संयमी लाटा अशा
मग पहावे सूर्यास निरखुनी
अंतःकरण घ्यावे की पारखुनी

आजूबाजूस किती ही हिरवाई
मनी उगाच दुःखाची दुखराई
त्यास चिखल करून तुडविता
वर आनंदकंदाची कमळाई

वाट पाहती कित्येक कळ्या अशा
कधी फुलण्या मिळेल वाव खरा
चित्त लावावे नारायणाच्या पायी
मग विकास साराच देख जरा

लिप्त नकोच संसारजल तनी
राहू त्यातच नको ते तरी मनी
पायी दलदल असू दे कितीतरी
वर मुखकमलाची शोभा भारी

असे उमलून येता आत कमळ
वर कांती झळके ना सकळ
सरोवराच्या विरुद्ध आपुले
चिखल वर तरी आत फुलणे

वरच्या लाटा वरचे पाणी
सारे चिखलही वर फेकणी
आत उमले कमलदल
चित्तसूर्याची अशी करणी

दि.११/१२/२०२०
सकाळी ०९.४९ वा.



## (६९)
## आज हसले गोकर्ण

आज हसले गोकर्ण निळे ते
खुदकन निळसर गाली
हिरव्या पानांमधे मोरपिशी
प्रभा छान सांडली

आत दुधाळ्या रंगांची
साथ निळ्या वर्णाला
आकाराने चोरीयले की
गाईच्या कर्णाला

आत डोकवे उगाच वेडे
शिवलिंगाची आस
कुणी खुडेल का तोडून मजला
नेई शिवाच्या पास

स्पर्श रेशमी दडते पानी
फूल लाजरे थोडे
गंध न त्याला लौकिक काही
शिवपरिमळ मनी वाढे

वेल कोवळी नाजूक फांद्या
हिंदोळ्यावर कळ्या नि कळ्या
अलगद वारा मारून टिचकी
उमलून देतो फूल पाकळ्या

गालावरती खळी शोभते
फूल लाजते नाजूक फार
रंग माधवाचा हा अंगी
आराध्य हे शिवशंकर स्वार

कुणी पाखरू पाहते फुलांना
मिचमीच डोळे उघडून झाप
फूलंही रमे त्याच्या लाडिक
चाळ्यासंगे उगा अमाप

सृष्टीमध्ये प्रत्येकाचे
दैव वेगळे रूप बहार
कुठल्या फांदीवरी उगवणे
कुठे वाहणे जीव सुमार

तरी हसावे, उमलून यावे
वाऱ्यासंगे झुलून घ्यावे
ऊनपावसासंगे खेळत
शरदालाही अंगी ल्यावे

नकोच रडणे उगाच कुढणे
सुकणे पडणे असो खुशाल
पुन्हा नव्याने मातीमध्ये
रुजून उमलून यावे विशाल

दि,.०२/०१/२०२०
सकाळी ११.५४ वा.



## (७०)
## कवाड

माझ्या मनाच्या कुटीला
न्हाई कवाड लावलं
येणं जाणं आपुलकी
सारं मोकळंढाकळं

ज्ञानदेवानं कवाड
रुसून की लावलेलं
झाले ताटीचे अभंग
केलं मुक्ताईनं खुलं

आजबी तरास तसा
ज्ञाना समाधीत जाय
न्हाई जागवण्या मुक्ता
झाला निवृत्त सोपान

मंग ठरवलं म्या बी
कुंडी कुलूप ना लावू
सारी झंझट काढून
नको कवाडंच लावू

राग लोभ नको मोह
अभिमान शिवू नगा
माझ्या झोपडीत बसा
नगा तरास देऊ उगा

जसे आला जावा तुम्ही
परतून की माघारी
माझ्या मनामंदी ऱ्हाई
माझा सावळा श्रीहरी

आता जागा न्हाई कुणा
यावं बनून पाव्हणा
न्हाय कवाड अडसर
सत्त्व भाव ठवी मना

त्याच्या आपुल्या मंदी हा
नगं कवाडाचा खेळ
न्हाय बसायाचा मग
सावळ्याशी कवा मेळ

असं भक्तीचं कवाड
ठेवू सताड उघडं
सुखदुःख त्याच्या पायी
जिवाशिवाची सांगड

दि.३०/०४/२१
सकाळी ११.०० वा.



## (७१)
## देवपण ते उजवं

घाव टाकीचे सोसता
पाषाणाला देवपण
तुला घाईच माणसा
सारे उतावळेपण

नाही कष्टाची तयारी
नाही सोसण्याचे बळ
पाय भाजल्याविना का कळे
तप्त भूमी तळमळ

सूर्य तापतो तापतो
तेव्हा तेज ते प्रचंड
दुःख सोसता सोसता
मन स्थिर हो उदंड

काट्याकुट्यातून चाले
चिखलात पाय बुडे
तेव्हा किसान रानात
पीक डौलात सापडे

नाही दमधीर थोडा
सारं लगेच ते हवं
असं कसं बा मिळेल
देवपण ते उजवं

चालो साधना सतत
आराधना निरंतर
नाम श्वासागणिक हो
तेव्हा भेटतो ईश्वर

स्पर्श त्याच्या नामाचा नि
त्याचे चिंतन करून
सुख देवाचे लाभते
दुःख सागरी बुडून

एक दिस उगवतो
सखा देव मग होतो
देवपण घेता घेता
देवपदासी हो नेतो

दि.२८/०६/२१
२१:२६



## (७२)
## वारी रानामंदी करू

चल करू टेहळणी
झाली कवाच पेरणी
कुटं कुटं कणसाची
सुरू झालीया तोडणी

बागबगीचा धुंडाळू
पेरू पिकले का पाहू
दोघं डहाळीशी झुलू
गोड मिठू मिठू बोलू

हिरवं हिरवं रान बघ
जरा हुशारीनं वाग
खाऊ मजेत मिरची
मारू दाण्यावर ताव

अर्धे अर्धे खाऊ फळं
जरा अंगा येई बळं
माणसाला नच कळं
पाखरांची हो चंगळ

विठू विठू बोल बोलू
झाड पंढरी ही चालू
गोड नाम ओठी धरू
वारी रानामंदी करू

दि.०३/०७/२१
रात्री १०.४९ वा.



## (७३)
## होय तुळस कळस

कृष्ण मंजिरीचा झाला
झाली मंजिरी सावळी
राधेश्याम गूढ काय
काय कहाणी निराळी

तुलसीची दले प्रिय
प्रियतमा ही मंजिरी
तिच्या कणाकणातून
भक्ती वाहते गोजिरी

वारी चालते चालते
डोईवरती तुळस
वारकरी राऊळाची
होय तुळस कळस

वाट पाहते पाहते
पावनता देह रूप
किती शोधूनि पहावे
आत मोहन स्वरूप

लीन होत रहाणे हो
परमेशाच्या चरणी
होता देह तुलसीचा
आत हरी आळवणी

दि.४/०६/२१
सकाळी ०९.४३ वा.



## (७४)
## तीट राधेचे मोहन काजळ

झुळझुळझुळझुळ वाहतो झरा
सरसरसरसर किरणे पसरा
झाडांच्या रेघारेघातून
सोनतोरणे चढवावी जरा

पहात होती वाट पहाट
भरभरभर सुरू जगती रहाट
उठून जलाने दिली अंगडाई
सळसळसळ पाने सळसळली

धुंद हवेचा सरसरसर सरवा
कुंद हवेतून सुरभित मरवा
खळखळखळ पाण्याचे गाणे
मस्तीमध्ये वाहो तराणे

पानापानांवरती कुजबुज
किलबिलकिलबिल विहंगमी गुज
हलचल हलचल मनात चंचल
लगबगलगबग युवती करतील

अवखळ अवखळ यमुनेचे जळ
तीट राधेचे मोहन काजळ
सोनपिवळी ही गोरीगोजिरी
राधा हरिहृदयात साजिरी

दि.०६/०७/२१
सकाळी ०९.०३ वा.



**(७५)**

**तो मनमोहन राधारंजन**

इतकी डवरून आलीस राधे
तुळशी वृंदावनी
अशा हासऱ्या गोड सावळ्या
अगणित त्या मंजिरी

पानोपानी कृष्ण सावळा
लपून बसला आहे
तुझ्या प्रीतीच्या आशेपायी
रुतून बसला आहे

कधी न झाले होईल ऐसे
मीलन वसुंधरेवर
पावन तुलसी राधाराणी
मोहन सुंदर ईश्वर

तिला न कारण फुलून येण्या
रोज पायी वाहते
आनंदा निज प्रियवर चरणी
वाहूनिया पाहते

त्यास भेटण्या उत्सुक ती तर
देही अथवा विदेही
तो मनमोहन राधारंजन
तिच्या संगती राही

घरात वसतो देवघरातून
मंजिरी मस्तकी त्याच्या
कसा प्रेमाचा वसा घेतला
राधा हृदयी ज्याच्या

अशा हरीच्या गुणगाणाला
निजगुण सांडून जावे
राधाराणी होऊन मनी या
मोहना मांडून यावे

दि.१३/०७/२१
सायं ०६.१३ वा.



## (७६)
## जीव रंगला हरीशी

एकादशी उपवास
एक जीवन प्रवास
त्याग घडावा सहज
विठुमाऊलीची आस

त्याच्या नामात रमावे
त्याच्या रुपात रुजावे
त्याच्या कृपेत भिजावे
त्याच्या कुशीत निजावे

त्याच्या गुणाचेच गाण
नाही दुजे कुणी जाण
दयेची तो उपजाण
ठेव सारेच गहाण

कुठे कुठे विठुराया
पदोपदी त्याचा ठावा
मनी संशय न व्हावा
लीन त्याच्या चरणाला

थोडे राहता उपाशी
ताट भरते द्वादशी
त्याच्या सवे वारी ऐशी
जीव रंगला हरीशी
जीव रंगला हरीशी

दि.२१/०७/२१
सकाळी ०९.२७ वा.



## (७७)
## पांग डोहाचे फिटते

डोह एक खोल खोल
वर पाहता अबोल
आत वादळ उसळे
कुणा कधी न च कळे

एक दुःखाचा हा डोह
गप्प आसवे गिळतो
आत खारेपण घेत
किती प्रसंग पाळतो

एक डोह आनंदाचा
सळसळ लाटा करी
आत लपल्या दुःखाला
थोडा विसर तो खरी

एक डोह चिंतारुपी
माणसाला खात जाई
एका डोहातुन दुजा
भोवऱ्यात नेत राही

एक काळजीचा डोह
चेहऱ्याला वृद्धपण
मन अस्थिर अशांत
अस्वस्थ कण कण

डोह नको अंतरी हे
साठलेले भावपाणी
भडा भडा हो बोलून
वाट करू झऱ्यावाणी
खळखळत्या पाण्याला
एक सुवास स्वछसा
नाद भिडतो हा कानी
नात्या मध्ये सेतू जसा

डोह दुर्गंध नि घाण
विष कालियाचे स्थान
त्याला मारणे हे जिणे
होऊ कृष्ण अभिमान

जळ नितळ करूया
आनंदाची जलक्रीडा
कृष्ण अंतरात्मा जागा
संसाराची नच पीडा

पांग डोहाचे फिटते
जल अमृताचे होते
अध्यात्माचा स्पर्श होता
जळ गवळण गाते
डोह सरोवर होते
रम्य सरोवर होते!!!

दि. ५/१२/२०२३,
सायं. २१:३६



## (७८)
## दवात दर्शन श्रीरामाचे

दव पानावरचे
हसू गालावरचे
थेंब मोतीया
आनंदाचे

थेंब उजळतो
रंग पानाचा
रंग पान
देई थेंबा

एकरंगी प्रतिबिंब
पाहता
परस्परांना
तनी शिरवा

तरारून दव
तरारतेपण
पाना मिळते
आंदण दान

शिशिरातल्या
गळतीपूर्वी
मौक्तिक सालंकृत
कन्यादान

दव टपोर
भावविभोर
माया माहेराची
शिदोरी फुलविण्याची

दव रोमांच
साजनस्पर्शी
रतीराणीचे
लज्जाभाव

दव गर्भातील
जीव बुडबुडा
प्राणांचा हा
कोश लहान

दव चिमुकल्या
बाळ ओठीचा
लाडिक पापा
हळूच टिपा

दव रमणीच्या
गालावरती
टपटपणारे
मोती टपोरे

दव वृद्धपणी
आसुसलेपण
स्मृतिबिंदू
आधारखणी

ऐक दवा रे
थांबून जा ना
हृदय पाकळी
घे विश्राम

कधी न मिटशील
तेथून राजा
स्मृती राऊळीचे
परमधाम

दवात दर्शन
श्रीरामाचे
एक सोहळा
अति अभिराम

दि.२९/६/१९
सकाळी: ८.५१



## (७९)
## तू शबरी ना

तू शबरी ना सत्ययुगाची
काय अवस्था कलियुगी
श्रीरामाला दिलेस गोड ते
बोरं चाखून प्रत्येकी

तुझ्या भक्तीचे चरम  गोडपण
आंबट बोरा रुचले की
सोडून देऊन आंबटपण ते
मधुररसाने भिजले की

तू वाट पाहिली मम स्वामींची
जन्मभरीची आशा नयनी
अशी प्रतीक्षा करेल कोणी
शबरी होईल तो तो क्षणी

प्रेम भक्तिमय वृद्धा शबरी
बालक झाले हो श्रीराम
तुझी नि त्यांची कथा सुंदरी
बोरे झाली अति अभिराम

आज इथे तू दुरवस्था का
नाही भेटला स्वामी राम
कशी तू सांगत आहेस आता
कलियुगाची व्यथा भयाण

मी त्याचा गं सेवक आणिक
दास सदोदित असेच जाण
सांग काय करू सेवा तुझी मी
उपकारांची फेड निदान

काय आणि कसे सांगू तुजला
हनुमंता तू भक्त महान
मनी आस बघ होती माझ्या
युगानुयुगे मज भेटेल धाम

कलियुगाची कथा निराळी
फासे सगळे उलटे रे
पोटी पुत्र तरी अनाथ माता
कालचक्र बघ पलटे रे

त्या युगात मी होते एकटी
तरीही राम आलेच घरा
क्षणात माझा जन्म उजवुनी
चुकवून गेले दुःखफेरा

मी वाट पाहिली प्राणपणे तशी
गोळे पोटचे जणू दानव
सोडून गेले वृद्धपणी मज
कसे म्हणू मी त्यांना मानव

कुठे तो गेला राम सांग मज
तू त्याचा प्रियभक्तच ना
मातापित्यांच्या वचनासाठी
वनवासी अनुरक्तच ना

त्या वनवासे किती जणांवर
उपकारांची बरसात
शबरीही न्हाली कृपेत त्यांच्या
शेवट झाला हर्षात

आज सोडती मातपित्यांना
वनवासाच्या गर्तेत
येईल माझा राम थांबले
भक्तीबोरे मज हृदयात

आज तू आला, असा भेटला
जसा तो प्रेमळ श्रीराम
पुसुनी मजला पुन्हा तू केले
शबरीजन्म सार्थक काम

तो आणिक तू नसे वेगळा
आज सांगते मी तुजला
तुझ्या येण्याने जन्म सफल हा
त्याच्या पायी बघ जीव वाहिला

ती तेव्हाची दास शबरी अन
आजची उदास ही म्हातारी
वाट पाहूनी थकले होते
आत्मदर्शनी ती स्वारी

प्रणाम तुजला करते बाबा
पोचेल त्याच्या चरणाशी
भक्ती तुझ्यासम करता यावी
राहीन अंतःकरणाशी

दि.५/१२/१९
रात्री १०.५३ वा.



ही सुंदरता पिवळ्या रंगा
सृष्टीमध्ये अवतरते
सोनपिवळा हा स्पर्श कोवळा
प्रसन्नतेचे ये भरते

रोज सकाळी सोने वितरित
करूनी सूर्य हा तेजस्वी
मीही या रंगास पांघरून
सकला भासतो ओजस्वी

या रंगाचे पडे चांदणे
भल्या पहाटे प्राचीला
चालून घ्यावे आरोग्याचे
सोने लुटुनी प्रभातीला

कांती पिवळी वधू हळदते
पितांबर नेसुनी अशी
सौभाग्याचे आरोग्याचे
दान मागते देवाशी

हळद लागते अंगाला अन्
मनास सोने उलगडते
नव्या वाटेवर पिवळे पिवळे
स्वप्न सोनेरी तिज पडते

## (८०)
## खंडेराय दारी

कांचन पिवळया उन्हात न्हाऊन
फुले डोलली ऐशी
रंग अनोखे सुरेख तनुवर
रंगकर्मी पाहशी

पिवळ्या उन्हाना खेळवीत बघ
अंगाखांद्यावर
पक्षी गोडूला धमक पिवळा
बसला फांदीवर

पीत सोवळे नेसून देवा
तूही पितांबरधारी
देवगुरु प्रिय रंग हा पिवळा
बृहस्पतींच्या मंदिरी

निसर्ग जन्मा घालीत राहील
वेगवेगळी रत्ने अमाप
पुष्कराज हा प्रसाद गुरूचा
पिवळ्या रंगाचाच अगाध

रंग हा पिवळा मनात बसला
जिकडे तिकडे सोने हे
या रंगातून वाट काढूनि
खंडेराय दारी जाणे हे

दि.३/१२/१९
सकाळी८.३७ वा.



## (८१)
## वाहा तू जीवाचे गोकर्ण

आजी म्हणायची, गोकर्णाची
फुलं आण गं बाळे गुणाची
शिवशंकरा प्रिय ही आहेत
आणिक सोबती ती बिल्वदळे

दोन रंगात फूल उमले
पूर्ण शुभ्र तर कृष्णतनु निळे
दुधाळ झाकी आत निळ्याच्या
रंगांची छटा खोल मनाच्या

वेल नाजूक, फूल कोवळे
अलगद हाताने खुड गं बाळे
गोमाता पवित्र, पावन गोमूत्र
तिच्या कानाचा आकार सत्त्व

कर्ण पटलासम ऐकावे सारे
पंचप्राण गोळा कानात व्हारे
ऐक गुरूंचे, मातापित्यांचे
वडीलधाऱ्या साऱ्या जनांचे

गोकर्ण ऐकून घेतो की सारे
शंकर भक्तीचे वाहती वारे
गूज मनीचे शिवाच्या पायी
फूल गोकर्ण ठेवते बाई

सत्त्व भावाची उधळण करते
गोकर्णाची वेल फुलात बोलते
भक्ती असावी विस्तीर्ण पात्र
अंतरंगात सूक्ष्म ते गात्र

आत्मा नाम असे अंतरंगाचे
आत्माराम सुंदर सत्य शिवाचे
गोकर्णासम जीवास करी
शिवाची भेट होय अंतरी

वाहा तू जीवाचे गोकर्ण फूल
शिवपिंडीवर नम्र वाकून
बाह्य ध्वनी नको ऐकूस आता
नमः शिवाय होऊ दे गाथा
नमः शिवाय होऊ दे गाथा

दि.४/१०/१९
सकाळी ६.२३ वा.



## (८२)
## धडे भक्तीचे

हरवले हरवले
मन माझे हरवले
धडे भक्तीचे भक्तीचे
भक्तीचे गिरवले

झालो वारकरी वारकरी
वारकरी आज झालो
चंद्रभागेत भागेत
भागेत आज न्हालो

गळा तुळशीची तुळशीची
तुळशीची माझ्या माळ
बोले विठ्ठल विठ्ठल
विठ्ठल हा टाळ

आल्या पालख्या पालख्या
पालख्या दारी आल्या
कडा डोळ्याच्या डोळ्याच्या
डोळ्याच्या ओल्या झाल्या

दिंड्या चालल्या चालल्या
चालल्या पंढरीला
मला सावळा सावळा
सावळा विठू दावा

आज पाह्यला पाह्यला
पाह्यला विठुराया
मन होईना होईना
होईना परत जाया

मन ठेवलं ठेवलं
ठेवलं त्याच्या पायी
आता माझं रे माझं रे
माझं रे काही नाही

दि.११/०७/१९
स.०६:५०



## (८३)
## विठूला पाहून घ्या

माझ्या चेहऱ्याचा आनंद जाणून घ्या
माझ्या डोळ्यात विठूला पाहून घ्या

वास विठूच्या वारीचा घराण्याला
नामजपाची शिदोरी भरण्याला

मन धावत राहतं पंढरीला
चालत्या पावलांची स्पंदने अंतरीला

येता पंढरपुरी चंद्रभागेतिरी
सारी भावंडे भेटती वारकरी

स्नान करून भक्तीच्या सागरात
जाऊ धांवत विठूच्या गाभाऱ्यात

रूप सुंदर डोळ्यात साठवून घ्या
पायी विठूच्या माथा हा टेकवून घ्या

नातवंडाला पायाशी घातलं म्यां
माझ्याच रुपाला रूप दावलंय म्यां

कपाळी टीळा लागो तुझा लळा
तळमळत्या जिवाचा तू कळवळा

बाळरूपात विठ्ठल बा दिसला
नातवाला कवटाळीता तू हसला

सोन्या, विठूला हृदयी जपायचं
आषाढी कार्तिकी भेटायचं

तुझी सान पाऊले विठुराऊळी
निश्चिंत नि धन्य आजी माउली

वसा वारीचा तुलाही वसायचा
माणसा माणसात सावळा दिसायचा

दि.१०/०७/१९
रा.११:०७



## (८४)
## विठुरायाच्या पंढरपुरी

विठुरायाच्या पंढरपुरी
आज भरलीय जत्रा
तुझा आंनद ओसंडून
वाहतोय वारकरी मित्रा

डोळ्यात सपान रोजंच घेऊन
झोपत होतास हरीला पाहत
सावळ्या रूपाची भुरळ पडली
भारावून गेलास हरीच्या दारात

विठ्ठलनामाचा घोष उरात
भजन गातोय एकसुरात
जगाला विसरून पाऊल टाकतोय
भक्तिभाव आज आलाय भरात

चंद्रभागी न्हाऊन पुंडलिका पाहून
नामदेव पायरी क्षणभर झालास
माऊली तुकाराम म्हणता म्हणता
विठूचं लेकरू होऊन गेलास

कळसाचं दर्शन, आता विठूची ओढ
दिसू दे डोळा गोड देवाचं रूप
गाभारी येता मनाला भरती
विठू हसलाय गाली ते दिव्य स्वरूप

पायावर माथा भक्तीची गाथा
दर्शनानं सारं भरून पावलास
क्षणात देहभान विसरून आपलं
जीव, देवाच्या पायाशी काढून ठेवलास

दि.१०/०७/१९
स.९:१५ वा.



## (८५)
## दिव्य रूप सावळ्याचे

दिव्य रूप सावळ्याचे
त्याचा मुकुट आभाळी
सागरतळीची रत्ने
गुंफियली त्याच्या माळी

हात कटीशी ठेविले
त्यात दोन लोक मावले
भूलोकी विटेवरी
माझी विठाई माऊली

गगनाचे छत्र झाले
चंद्र सूर्य देवडोळे
किती नक्षत्रे नि तारे
त्याची सारीचं लेकुरे

अर्जुनाला युद्धस्थळी
दिव्य रूप दावीयले
आज माझ्या विठुराया
मीही तसेच पाहिले

बाप विठुराजा माझा
नाही आधार की दुजा
होता आकाश विठूचे
कण कण भासे खुजा

बरसतो कृपामेघ
वर्षावात चिंब होऊ
जन्मोजन्मीची पुण्याई
तीर्थ सेवनात घेऊ

तेजपुतळा सावळा
रंग सारे श्रीरंग
नाद भजनाचा तुझ्या
शांत मनाचा सारंग

दि.१०/७/१९
दु.५:१७ वा.



## (८६)
## देवा तुझ्या पूजेचा सोहळा

देवा तुझ्या पूजेचा सोहळा
आज डोळाभर म्या पाहिला

हृदयी तुझ्या भृगू ऋषीचा पाय
शिवपिंड तुझ्या शिरावर हाय

कटीवर हात ठेवलेस दोन्ही
माशाची कुंडले शोभलीत कानी

पायाच्या अंगठ्याला बोटाचा खोलवा
कान्होपात्रेचा अहंकार बोळवा

दह्याचा दुधाचा जळाचा अभिषेक
पुसून अंगा चंदनाचा लेप

भाळावर टिळा खुले सावळा
गळ्यात घाला तुळशीच्या माळा

कटी पितांबर भरजरी शेला
अंगरखाही सजून गेला

मुकुट मस्तकी रत्नांची प्रभा
विठुला नवं जानवं घाला

अर्ध उन्मीलित देवाचे डोळे
मुखावर गोड हास्य फुलले

देखण्या रूपाचा विठू गोजिरा
स्वरूप देखण्या आरसा दाखवा

आपल्या रूपा हरीही भुलला
भक्तीची दागिने लेवूनी सजला

मुखात लोण्याचा गोळा ही दिला
नैवेद्याच्या घास भरविला

आरती झाली दृष्ट काढिली
दर्शना  भक्तांची गर्दी वाढली

पूजेत देवा, पुजारी झालो
मूर्त होत तुझ्यासवे नाहलो

मी आणि विठू नाही वेगळे
अद्वैत पूजेचे गोड सोहळे

दि.११/७/१९
पहाटे.४:०० वा.




## (८७)
## याची देही याची डोळा

याची देही याची डोळा
देखीयला म्या सोहळा
अंतरात साठवला
विठुराया गं सावळा

त्याच्या दरबारात
कितीवेळ रमले मी
पायी डोके ठेऊन
मनासह नमले मी

काकड आरती त्याची
पूजा सर्वोपचार
टिळा चंदनाचा
गळा तुळशीचे हार

पाय धरता विठूचे
पाणी तराळे डोळ्यात
खोल खोल उतरला
बाप विठू हृदयात

त्याच्या कृपेचाच हात
हाती तीर्थ प्रसाद
गाभा सोडवेना मला
त्याच्या भक्तीचीच आस

तुळशीचा मनी वास
त्याच्या पूजेचा सुवास
घेता निरोप तयाचा
आत्मरूपी अधिवास

माय रुख्मिणी माझी
उभी लेकींच्या स्वागता
किती कष्ट भक्तासाठी
जगजेठी हो झेलता

ती बोलता बोलता
त्याची गाऱ्हाणी सांगते
रागावली वर जरी
त्याची काळजी वाहते

म्हणे सोड आमुचे हे
आता रोजचेच झाले
भक्त देखतो सावळा
मीच दिसेनाशी झाले

खूप भांडले एकदा
मी बोलणे टाकले
त्याच्या हृदय दर्पणी
मला भक्तची दिसले

मग राग सोडला मी
भक्त माझीही लेकुरे
त्याग संसारसुखाचा
परी कुटुंब साजिरे

सांग लेकी तू गं कशी
पोरं बाळं शेतीवाडी
इहलोकीच्या बाजारी
तुला आमुचीच गोडी

थांब जरा गं कुंकू लावते
लक्ष्मी वसा मी तुला सांगते
सेवा करशील जितकी बाळे
माय तुझी ही हरखुन जाते

गळाभेट ती ऐशी झाली
माय माऊली हळवी ओली
तिच्या पायी मी स्वर्ग पाहिला
प्रेमवेडी ती हट्टी अन भोळी

माय रुख्मिणीने
साडीचोळी केली
माहेरपणाची
सांगताही झाली

एक वारी हृदय द्वारी
भक्तिरसमय गात्रे सारी
माय माऊली, बाप साऊली
मी अभंगा ओवी गायिली

दि.१४/७/१९
रात्री ८.११ वा.




## (८८)

### प्रतीक राधा केवळ होते

राधे तुझ्या प्रेमासाठी
श्याम रास रंगतो
ऐक सखे आज तुला
गुज मनी सांगतो

प्रेम तुझे आत्मरूप
पाहता तुला स्वरूप
नयनी तुझ्या देखतो
श्याम राधा भासतो

बंधन कसले या देहाचे
प्रेम राधे गं तुझे हे ऐसे
देहातीत ही राधा होते
पवित्र प्रेमा लेऊन येते

अष्टभाव जागृतीस आणूनि
अबोल तरी तू राधाराणी
लौकिक देहिक रीत प्रेमाची
कधीच नसते आपुल्या मनी

नेत्रदर्पणी तुझ्या गं वेडे
श्यामछटा या भरून जाती
श्वासांमधल्या लयीस पाहून
श्यामजपाचे ध्वनी ही येती

हळूच उतरतो अंतरात तव
राधा कोठे, कोठे तू तर
शोधून शोधून थकलो मी गं
श्यामंच श्याम तुझ्या मनावर

तुला पाहण्या समजून घेण्या
श्याम उतावीळ सायंकाळी
सूर वेणूचे पसरून जाती
तुझ्याजवळ ते तिन्ही त्रिकाळी

सांग सखे मज चैनच नाही
राधा मजला पाहू दे खरी
राधा राधा करीशी वेड्या
राधा आता उरली नाही

राधा झाली श्याम अशी की
तिलाही ती रे कळली नाही
कळतो राधेला श्यामगोडवा
अनन्या तिजसम घडली नाही

म्हणून देवा जीव गुंतला
राधेपायी तुझा चांगला
प्रतीक राधा केवळ होते
प्रेम हरीचे सफळ इथले

दि.१८/७/१९
सकाळी ७.२६ वा.



## (८९)
## विठुमाऊली हो दंग

बोबड्या बोलात माझ्या
विठुमाऊली हो दंग
संत कळवळा ल्येता
शब्द झाले की अभंग

सूर माझा बेसुरीचा
बासुरीचा सूर होतो
पाहता विठूस माझ्या
मायाभ्रम दूर होतो

तुळशीच्या मंजिरीचा
भजनाला गंध येतो
वारकरी माझ्यासवे
श्रीहरी हा धुंद होतो

चंद्रभागा जळामध्ये
अमृताची लाट वाहे
पुंडलिकासम भक्ती
मंदाकिनी होत आहे

डोळे माझे पाहताच
पंढरीचे चित्र झाले
विठू माऊली झाली अन
वारकरी मित्र झाले

शब्द शब्द पोकळ माझे
पांडुरंग अर्थ आहे
विठ्ठलाविना हा जन्म
फोल आणि व्यर्थ आहे

गाथा पंढरीची गाता
संतवाणी ही अमृता
वैकुंठाच्या उद्यानात
वृंदा तुळशीच्या कथा

दि.११/७/१९
स.७:५० वा.




(९०)

## आज नमन या गुरुराजांना

गुरुचरणांनी आश्रय दिधला
कणाकणांना अर्थ मिळाला
ध्यान, ज्ञान, सन्मान कळाला
अज्ञानतम घनदाट पळाला

स्थान अवर्णनीय गुरुवर्यांचे
भूतलप्रकटित देवच आमुचे
दिशा दाखवत जीवन घडविले
सत्त्वासाठी असत्या बडविले

अपराधांना पोटी घालत
पाठीवरती कौतुक थाप
गुरुच होती माता आणिक
गुरुच येथे समर्थ बाप

युगायुगांची ज्ञानपरंपरा
वसा घेत देत गुरू साकारा
शब्दब्रह्म ते चिर परात्परा
ज्ञानसुवास येई मज रुधिरा

आज नमन या गुरुराजांना
पदोपदीच्या दीपस्तंभांना
मातेपासून साऱ्या साऱ्यांना
साष्टांग प्रणाम मम अभिजनांना

दि. १६/७/१९
सायं ५.५५ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा (देवभक्तीपर) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये ‘मंजु मंजिरी’ आणि ‘सर्ग निसर्ग’ नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(देवभक्तीपर) – ईश भाग्येश, (राधाकृष्ण) – रूप–स्वरूप, श्रीरंग, कृष्णकांत, (प्रासंगिक) – मंगेश, आंदण, (निसर्गपर) – सृष्टीगंध, (चंद्र) – सुधांशु, (सूर्य) – दिव्यांतरी, (प्रीत – तिच्या मनातील कविता) – नादश्रुती, श्वेता, (सकाळ–संध्याकाळ) – लाघव वेळा, (वेळा) – तेंव्हा, (प्रेम – त्याच्या मनातील कविता) – प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) – गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) – अलवार, मधुश्री, सहा सोहळे, (फुले) – अळुमाळु, सुरभी, (पशु) – खाणाखुणा, (पक्षी) – वैष्णवी, (स्त्रीजीवन) – स्वामिनी, मृणालिनी, (धरती–आकाश) – प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) – मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) – श्रावणी, (गझल) – उल्का, (रसिकप्रतिक्रिया – कवीश्वर) – बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) – प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) – जरा रेंगाळले, (Audio - Book) – युगंधरा, कामिनी, (रंग) – रंगतनु, (गझल) – मनस्विनी,

(सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष -**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२-२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान - २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार - २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर - ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०

- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source=whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utmsource=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान<br>- डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी<br>यांचा जागतिक काव्य विक्रम<br>केल्याबद्दल राज्यपालांच्या<br>हस्ते सत्कार ‘साहित्यिक व<br>संतांनी देश एकसूत्रात बांधला’<br>भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम –<br>‘‘सर्ग_निसर्ग’’ ऑडिओ<br>अल्बम – ‘‘मंजुमंजिरी’’ | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ५०
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ५३
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●